दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ११० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये







# घटनात्मक पायाभरणीमुळे भारताची लोकशाही सशक्त

## राज्यपाल जिष्णु देव वर्मा : जागतिक अर्थव्यवस्थेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आजही कालसुसंगत - मुख्यमंत्री



**मुंबई (दै. संध्या)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान हे समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. त्यांच्या विचारांमुळेच वंचित, पीडित आणि दुर्बल घटकांना आत्मसन्मान, समान संधी, न्यायाचा मार्ग मिळाला आहे. संविधानातील घटनात्मक पायाभरणीमुळे भारताची लोकशाही सशक्त झाली आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले. दादर येथील चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, महापौर रितू तावडे उपस्थित होते. राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले, स्त्री-पुरुष समानतेच्या बाबतीतही डॉ. आंबेडकर अग्रणी होते. महिलांना शिक्षण, संपत्ती आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या योगदानामुळेच भारत प्रजासत्ताक झाल्यापासून महिलांना समान मतदानाचा अधिकार मिळाला. महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाची सुरुवात होत असून, या निमित्ताने जातीयतेपासून मुक्त आणि भेदभावविरहित समाज घडविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन राज्यपालांनी यावेळी केले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले आर्थिक दृष्टिकोन, चलनव्यवस्था आणि आर्थिक स्थैर्य याविषयीचे विचार आजही कालसुसंगत आहेत. जागतिक पातळीवर अर्थकारणात होत असलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व अधिक असल्याचे सांगून जागतिक अर्थव्यवस्थेतही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार महत्त्वाचे असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधील त्यांच्या संशोधनातून डॉ. आंबेडकरांनी भारतात केंद्रीय बँकेची गरज अधोरेखित केली होती. त्यांच्या विचारांवर आधारितच पुढे 'रिझर्व बँक ऑफ इंडिया'ची स्थापना झाली. तसेच 'गोल्ड स्टँडर्ड' आणि चलनाच्या खरेदी शक्तीबाबत त्यांनी मांडलेले विचार आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेतही मोलाचे ठरत आहेत. त्यांच्या 'प्रॉब्लेम्स ऑफ रुपी' या प्रबंधातून रिझर्व्ह बँकेच्या स्थापनेचा पाया रचला गेला. १९२३ मध्ये डॉ. आंबेडकरांनी मांडलेल्या आर्थिक विचारांच्या आधारावरच आज जग वाटचाल करत आहे. त्यांच्या प्रबंधात मांडलेल्या तत्त्वांवरच भारताची अर्थव्यवस्था उभी आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर माणुसकीचे शिल्पकार : शिंदे

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान हाच आपला राष्ट्रधर्म असून बाबासाहेब हे केवळ भारतीय संविधानाचे शिल्पकार नसून माणुसकीचेही शिल्पकार आहेत. त्यांनी लिहिलेल्या राज्यघटनेमुळे देशातील शेवटच्या माणसालाही न्याय आणि सन्मान मिळण्याचा मार्ग सुकर झाला, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

# ज्येष्ठ गायिका आशाताईंच्या अंत्यसंस्कारावरून राजकीय युद्ध

■ मिलिंद देवरा राजकारणातील सर्वात खालच्या पातळीचा नमुना, कॉंग्रेसचे जोरदार प्रत्युत्तर

**मुंबई (दै. संध्या)**

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या पार्थिवावर शिवाजी पार्क स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार पार पडले. मात्र या दुःखद प्रसंगातही खासदार मिलिंद देवरा यांच्या एका वादग्रस्त ट्विटमुळे राजकीय आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले आहे. देवरा यांनी काँग्रेसला उद्देशून केलेल्या टीकेवर महाराष्ट्र काँग्रेसने अत्यंत तिखट शब्दांत पलटवार केला असून, शिंदेंचे उपकार फेडण्याचा प्रयत्न करणारा गद्दार मिलिंद देवरा हा राजकारणातील सर्वात खालच्या पातळीचा नमुना ठरतो, अशा शब्दांत टीका केली आहे. मिलिंद देवरा यांनी ट्विट करत म्हटले होते की, आशा भोसले यांच्या अंत्यसंस्कारासाठी आज मुंबईत उपस्थित राहिलो. सर्वच स्तरांतील लोकांनी एकत्र येत प्रेम, संगीत आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त करत त्यांना अखेरचा निरोप दिला. प्रत्येक राजकीय पक्षाने या दुःखद प्रसंगी वरिष्ठ प्रतिनिधित्व सुनिश्चित केले होते. मात्र, एक अपवाद ठळकपणे दिसला, जो देशाच्या सांस्कृतिक स्पंदनापासून त्यांचा तुटलेपणा दर्शवतो, असे ट्विट त्यांनी केले होते. या ट्विटला महाराष्ट्र कॉंग्रेसने प्रत्युत्तर दिले आहे. कॉंग्रेसने प्रत्युत्तर देताना म्हटले की, लाचारी, मुर्खपणा आणि अज्ञान यालाही काही सीमा असते म्हणतात, पण मिलिंद देवरांनी ही सीमा कधीच ओलांडली आहे. मिलिंद देवरांच्या वडिलांचे सहकारी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते व देशाचे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य, माजी मंत्री नसीम खान, खासदार प्रणिती शिंदे आणि प्रदेश काँग्रेसचे अनेक जबाबदार पदाधिका-यांनी स्वतः जाऊन आशाताई भोसले यांना श्रद्धांजली वाहिली. ही आपली संस्कृती आहे, परंपरा आहे, आणि माणुसकी आहे. पण दुसरीकडे, शिंदे गटाच्या दारात उभं राहून खासदारकीची भीक मागणारा आणि ती मिळाल्यावर उपकार फेडण्यासाठी खोटे बोलून काँग्रेसवर चिखलफेक करून शिंदेंचे उपकार फेडण्याचा प्रयत्न करणारा गद्दार मिलिंद देवरा हा राजकारणातील सर्वात खालच्या पातळीचा नमुना ठरतो.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


## ढिंग-टांग




# सम्राट चौधरी बिहारचे मुख्यमंत्री?



**मुंबई (दै. संध्या)**

सम्राट चौधरी बिहारचे नवे मुख्यमंत्री असतील. त्यांची भाजप विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड झाली आहे. एनडीएच्या बैठकीनंतर याची औपचारिक घोषणा होईल. उद्या १५ एप्रिल रोजी लोकभवनात शपथविधी सोहळा होईल.

आज नितीश कुमार यांनी बिहारच्या मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. ते सम्राट चौधरी आणि विजय चौधरी यांच्यासोबत एकाच गाडीतून राजभवनात पोहोचले आणि राज्यपालांना राजीनामा सादर केला.

राजीनाम्यानंतर त्यांनी X वर लिहिले - 'आता नवीन सरकार येथील काम पाहिल. नवीन सरकारला माझे पूर्ण सहकार्य राहील. पुढेही खूप चांगले काम होईल, बिहार खूप पुढे जाईल.' यापूर्वी राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन नितीश कुमार यांना भेटायला पोहोचले. त्यांच्यासोबत सम्राट चौधरी आणि भाजपचे अनेक ज्येष्ठ नेतेही होते. आज नितीश मंत्रिमंडळाची शेवटची बैठक झाली. जिथे नितीश म्हणाले - '२००५ मध्ये मी सरकारमध्ये आलो, माझ्याकडून जेवढे शक्य झाले तेवढे मी केले, नवीन सरकारला माझे मार्गदर्शन मिळत राहील.' भाजप विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड झाल्यावर सम्राट चौधरी म्हणाले, भाजपने मला काम करण्याची संधी दिली.

# १८० तरुणींचे लैंगिक शोषण आणि ३५० अश्लील व्हिडिओ व्हायरल

**अमरावती (दै. संध्या)**

अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथे अनेक तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून, त्यांचे लैंगिक शोषण केल्याच्या आणि त्यानंतर ब्लॅकमेल करून अत्याचार केल्याच्या गंभीर आरोपाखाली मोहम्मद अयाज मोहम्मद तनवीर या संशयित आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. या प्रकरणात भाजप खासदार अनिल बोंडे यांनी संबंधित आरोपीने तब्बल 180 तरुणींचे शोषण करून त्यांचे 350 व्हिडिओ व्हायरल केल्याचा धक्कादायक आरोप केल्यानंतर पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवत ही कारवाई केली असून, या खळबळजनक प्रकरणाचा अधिक तपास सध्या सुरू आहे. नाशिकच्या भोंदूबाबा अशोक खरातचे प्रकरण ताजे असतानाच, अमरावती जिल्ह्यातही मोहम्मद अयाज मोहम्मद तनवीर या तरुणाने सुमारे 200 मुलींचे लैंगिक शोषण केल्याच्या खळबळजनक आरोपाने मोठी खळबळ उडाली आहे. या गंभीर प्रकरणाची दखल घेत पोलिसांनी आरोपीवर गुन्हा दाखल करून त्याला तातडीने अटक केली असून, न्यायालयात हजर केले असता त्याला 21 एप्रिलपर्यंत सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या धक्कादायक प्रकरणाचा अधिक तपास आता पोलिस यंत्रणेमार्फत केला जात आहे. परतवाडा पोलिसांनी अश्लील व्हिडिओ प्रकरणी ताब्यात घेतलेला युवक एमआयएमचा कार्यकर्ता असल्याचा खळबळजनक आरोप खासदार अनिल बोंडे यांनी केला असून, हे केवळ एका व्यक्तीचे कृत्य नसून यामागे एक मोठी टोळी सक्रिय असल्याचा दावा त्यांनी केला आहे. या टोळीने स्नॅपचॅट आणि व्हॉट्सॲपवर ग्रुप्स तयार करून हे जाळे पसरवले असल्याचे सांगत, पोलिसांनी संबंधित आरोपींचे मोबाईल जप्त करून त्यांच्या कॉल डिटेल्सची आणि संपर्काची सखोल चौकशी करावी, अशी आग्रही मागणीही बोंडे यांनी यावेळी केली आहे.

अनिल बोंडे म्हणाले, या प्रकरणात काही मुस्लिम आणि हिंदू समाजाच्या मुली देखील आहेत. हे जाळे खूप मोठे पसरलेले आहे, आणि विशेष म्हणजे चिखलदरा हॉटेलमधील पोलिसांनी सीसीटीव्ही जप्त करून सहा महिन्यातील फुटेज तपासले तर त्या आधारे रॅकेट उघड होऊ शकते. पोलिसांनी या प्रकरणाच्या खोलात जायला पाहिजे आणि महिला अधिकाऱ्यांनी आणि सायबर मधील अधिकारी यांची नेमणूक केली पाहिजे, अशी मागणी देखील बोंडे यांनी केली आहे.



आरोपी मोहम्मद अयाजला बेड्या

दरम्यान, पोलिसांनी आरोपीचा मोबाईल जप्त करून तपास सुरू केला असून, त्यामध्ये अनेक धक्कादायक अश्लील व्हिडिओ असल्याचे समजते. हे व्हिडिओ आरोपीने आपल्या मित्रांना पाठवले आहेत का, याचा शोध घेतला जात असतानाच त्याचे तरुणींसोबतचे काही अश्लील व्हिडिओ सोशल मीडियावर आधीच व्हायरल झाले आहेत. आरोपीने पुराव्यांचा नाश करण्यासाठी मोबाईलमधील मोठा डेटा डिलीट केला असला तरी, सायबर तज्ज्ञांच्या मदतीने तो रिकव्हर करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. गेल्या एक वर्षापासून हा गैरप्रकार सुरू असल्याची कबुली आरोपीने दिली असून, प्राथमिक चौकशीत त्याने आतापर्यंत सात पीडित तरुणींची नावे उघड केली आहेत.

## ब्रेकिंग न्यूज

### पेट्रोल १८ रू. आणि डिझेल ३५ रू. महाग?

नवी दिल्ली(दै. संध्या) : कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे पेट्रोल ₹18 आणि डिझेल ₹35 प्रति लिटरपर्यंत महाग होऊ शकते. विदेशी ब्रोकरेज फर्म मॅक्वायरीच्या अहवालात म्हटले आहे की, कच्चे तेल महाग असूनही देशात पेट्रोल-डिझेलच्या किमती स्थिर आहेत. यामुळे कंपन्यांना नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत, पश्चिम बंगालसह 5 राज्यांमधील निवडणुका संपल्यानंतर कंपन्या दर वाढवू शकतात. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतीमुळे कंपन्यांना प्रति लिटर पेट्रोलवर 18 रुपये आणि डिझेलवर 35 रुपयांचे नुकसान होत आहे. गेल्या महिन्यात उच्चांकी पातळीवर असताना, या तिन्ही कंपन्यांना दररोज सुमारे 2,400 कोटी रुपयांचे नुकसान सोसावे लागत होते. उत्पादन शुल्कात 10 रुपयांची कपात केल्यानंतर, हे नुकसान कमी होऊन 1,600 कोटी रुपयांवर आले आहे. प्रत्येक 10 डॉलरच्या वाढीमुळे नुकसान प्रति लिटर सुमारे 6 रुपयांनी वाढते. भारत आपल्या गरजेच्या सुमारे 88% कच्चे तेल आयात करतो. यापैकी 45% मध्य पूर्वेतून आणि 35% रशियातून येते. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती केवळ तेल कंपन्यांसाठीच नव्हे, तर देशाच्या चालू खात्यातील तुटीसाठी देखील धोकादायक आहेत.

**दै. संध्या अँकर** महिला आरक्षण लागू होणार; मोदी सरकारचा मोठा प्लॅन समोर

# लोकसभेतील खासदारांची संख्या ८५० होणार

**मुंबई (दै. संध्या)**



देशातील लोकप्रतिनिधित्व अधिक समतोल आणि व्यापक करण्यासाठी केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. लोकसभेतील एकूण जागा 545 वरुन 850 पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून यासाठी संविधान (131वा दुरुस्ती) विधेयक 2026 संसदेत मांडले जाणार आहे. या प्रस्तावानुसार 815 जागा राज्यांसाठी तर 35 जागा केंद्रशासित प्रदेशांसाठी राखीव ठेवण्यात येणार आहेत. संसदीय कार्य राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या माध्यमातून हे विधेयक सादर होणार आहे.

या विधेयकामुळे लोकसभेच्या संरचनेत मोठा बदल होणार आहे. सध्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी जागांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाढत्या शहरीकरण, स्थलांतर आणि राज्यांमधील लोकसंख्येतील असमतोल लक्षात घेऊन हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

संविधान (131वा दुरुस्ती) विधेयकाद्वारे अनुच्छेद 81 मध्ये बदल करण्यात येणार आहे. तसेच लोकसंख्येची नवी व्याख्या निश्चित केली जाणार असून, संसदेद्वारे मान्य केलेल्या जनगणनेनुसारच प्रतिनिधित्व निश्चित होईल. या विधेयकात डिलिमिटेशन प्रक्रियेतही मोठे बदल सूचवण्यात आले आहेत. जागांचे पुनर्निर्धारण (Delimitation) करण्याची जबाबदारी स्पष्टपणे निवडणूक आयोगाकडे सोपवण्यात येणार आहे. 2026 नंतरच्या जनगणनेची वाट पाहण्याची अट हटवून प्रक्रिया अधिक लवचिक करण्यात आली आहे. हा प्रस्ताव नारी शक्ति वंदन अधिनियम लागू करण्यासाठी महत्त्वाचा मानला जात आहे. या अंतर्गत लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये 33 टक्के महिला आरक्षण लागू होणार आहे. डिलिमिटेशन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महिलांसाठी एक-तृतीयांश जागा राखीव केल्या जातील. या जागांचे रोटेशन केले जाईल आणि आरक्षणाची मुदत 15 वर्षे ठेवण्यात येणार आहे.

विधेयकात अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोरम आणि नागालँड यांसारख्या ईशान्य राज्यांमध्ये अनुसूचित जमातींचे प्रतिनिधित्व कायम राखण्यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्रिपुरामध्येही सध्याचे प्रमाण जतन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. नवीन तरतुदी लागू होईपर्यंत सध्याची लोकसभा आणि विधानसभांचा कार्यकाळ अबाधित राहणार आहे. डिलिमिटेशन पूर्ण झाल्यानंतरच नवीन रचना लागू होईल, त्यामुळे प्रशासनात सातत्य राहील.

या विशेष अधिवेशनात सरकार तीन महत्त्वाचे विधेयक सादर करणार असून, त्यामध्ये जागा वाढवण्याचा प्रस्ताव, डिलिमिटेशन विधेयक 2026 आणि केंद्रशासित प्रदेश कायद्यात सुधारणा यांचा समावेश आहे.

# इराणसोबत चर्चा निष्फळ ठरल्यानंतर ट्रम्प यांनी फिरवला मोदींना फोन

**मुंबई (दै. संध्या)**



इराण आणि अमेरिकेमध्ये चर्चेची पहिली फेरी निष्फळ ठरल्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी फोनवरुन चर्चा केल्याची माहिती आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि नरेंद्र मोदी यांच्यामध्ये तब्बल 40 मिनिटे चर्चा झाल्याची माहिती आहे. इराण युद्ध आणि भारत-अमेरिका संबंधावर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. अमेरिका आणि इराण या दोन देशांदरम्यान युद्ध थांबवण्यासाठी चर्चेची पहिली फेरी पार पडली. पाकिस्तानमध्ये पार पडलेली ही पहिली फेरी निष्फळ ठरली. त्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी मोदींशी चर्चा केल्याने त्याला महत्व प्राप्त होत आहे. गेल्या महिन्याभरात नरेंद्र मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात हा दुसरा फोन आहे. अमेरिका आणि इराणमध्ये चर्चेची पहिली फेरी निष्फळ ठरल्यानंतर आता दुसऱ्या फेरीसाठी प्रयत्न सुरु आहेत. अमेरिका आणि इराणमध्ये चर्चेची दुसरी फेरी 16 एप्रिलला होण्याची शक्यता आहे. अमेरिकेच्या राजनैतिक अधिकाऱ्यांच्या सूत्रांच्या हवाल्यानं बातमी मिळत आहे. चर्चेची दुसरी फेरी ही इस्लामाबाद किंवा जिनेव्हामध्ये होण्याची शक्यता आहे. युद्धविरामाची मुदत संपण्याआधी पुन्हा चर्चेची शक्यता आहे. पाकिस्तान, तुर्कीए, इजिप्त चर्चेसाठी मध्यस्थी करत आहेत. चर्चा पुन्हा सुरू करण्याचा संयुक्त राष्ट्रांचाही आग्रह असल्याची माहिती मिळत आहे. इराण चर्चेसाठी पुन्हा उत्सुक असल्याचं इराणनं फोन करुन सांगितल्याची माहिती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली. इराण चर्चेसाठी पुन्हा तयार असल्याचं ट्रम्प म्हणाले. इराण अमेरिकेसोबत करार करण्यासाठी उत्सुक असल्याचा ट्रम्प यांनी दावा केला. इराण सर्व अटींवर सहमत नाही झालं तर करार होणार नाही असंही ते म्हणाले. इराण जवळ कधीच आण्विक हत्यार राहणार नाहीत अशी प्रतिक्रिया ट्रम्प यांनी दिली. इराण आणि रशियाच्या परराष्ट्रमंत्र्यांची फोनवरून चर्चा झाल्याची माहिती आहे. चर्चेची पहिली फेरी निष्फळ ठरल्यावर आता पुढे काय याची चिंता या दोन्ही देशांना आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीचाही प्रश्न चिघळत आहे. त्यातच रशियाने आता युद्ध थांबवण्यासाठी पुढाकार घेण्याचं सुतोवाच केलं आहे. इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची आणि रशियाचे परराष्ट्रमंत्री सर्गेई लाव्हारोव्ह यांनी चर्चा करून युद्धासंदर्भात चर्चा केल्याची माहिती आहे.

# संपादकीय

## होर्मुझच्या कात्रीत जग!

पाकिस्तानात अमेरिका आणि इराणदरम्यान तब्बल एकवीस तास चाललेल्या ऐतिहासिक वाटाघाटी अखेर निष्फळ ठरल्या. अमेरिकन शिष्टमंडळाचे प्रमुख, उपराष्ट्राध्यक्ष जे. डी. व्हान्स यांनी पाकिस्तान सोडताना सांगितले की, करार झालेला नाही आणि हे अमेरिकेपेक्षा इराणसाठी अधिक वाईट आहे. इराणी सरकारी प्रसारमाध्यमांनी अमेरिकेच्या अवाजवी मागण्यांमुळे करार फिस्कटल्याचे सांगितले. होर्मुझची सामुद्रधुनी आणि इराणचा आण्विक कार्यक्रम या दोन मुद्द्यांवर घोडे अडले ! आता पुढे काय? युद्ध पुन्हा भडकेल का? उर्वरित जगावर याचे काय परिणाम होतील? संपूर्ण जग सध्या श्वास रोखून या प्रश्नांची उत्तरे शोधत आहे. इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीत मोजक्या मित्रदेशांच्या जहाजांना विशेष परवाने देऊन आणि काहींना २० लक्ष डॉलर्सची जकात आकारून मार्ग दिला होता. आता अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही होर्मुझच्या सामुद्रधुनीची नाकेबंदी करण्याचा इशारा दिला आहे. त्यामागे इराणचे हे दबावसाधन संपविणे आणि इराणला तेल विकण्यापासून रोखणे, हा उद्देश स्पष्ट दिसतो. जगासाठी हे एक दुधारी अस्त्र ठरेल. नाकेबंदी आणि प्रतिनाकेबंदीच्या कात्रीत जग सापडले आहे. होर्मुझची सामुद्रधुनी एका ठिकाणी अवघी ३४ किलोमीटर रुंद असली तरी तिच्यातून दररोज सुमारे दोन कोटी बॅरल खनिज तेल वाहतूक होते. ती जगाच्या एकूण सागरी तेलव्यापाराच्या जवळपास २० टक्के आहे. गतवर्षात या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या तेलाचा ८० टक्के हिस्सा आशियाई देशांकडे गेला. युद्धापूर्वी भारत आणि चीनच्या गरजेपैकी सुमारे ५० टक्के तेल या सामुद्रधुनीतून जात होते. युद्ध सुरू असतानाही चिनी, भारतीय आणि पाकिस्तानी जहाजांना या सामुद्रधुनीतून जाण्याची परवानगी इराणने दिली होती. आता अमेरिकेच्या नाकेबंदीमुळे त्या देशांचा रस्ताही बंद होईल. चीनकडे काही महिन्यांचा तेलसाठा असला तरी दीर्घकाळ ही परिस्थिती सहन करणे चीनलाही शक्य नाही. भारताची परिस्थिती तर अधिक नाजूक आहे. भारत आपल्या एकूण तेल गरजेच्या मोठ्या भागासाठी आखाती देशांवर अवलंबून आहे आणि सामुद्रधुनी बंद झाल्यास पर्यायी पुरवठा साखळी उभारणे हे मोठेच आव्हान आहे. परिणामी तेलाचे भाव गगनाला भिडतील, महागाई वाढेल आणि अर्थव्यवस्थेवर दडपण येईल. जागतिक बाजारपेठा आधीच गडगडल्या आहेत. तेलाबरोबरच खते, सल्फर, हेलियम आणि इतर महत्त्वाच्या वस्तूंचा पुरवठाही विस्कळीत होण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. अमेरिका आणि इराणने वाटाघाटीत सद्भावनेने सहभाग घेतल्याचा दावा केला असला तरी, मतभेद कमी झालेले नाहीत. उभय देशांत दोन आठवड्यांच्या युद्धविरामावर सहमती झाली होती. त्यापैकी आता अवघे आठ दिवस उरले आहेत. आंतरराष्ट्रीय विश्लेषकांच्या मते, ताबडतोब युद्ध पेटण्याची शक्यता कमी आहे; परंतु अस्थिरता परतण्याची दाट शक्यता आहे. पाकिस्तानचे परराष्ट्रमंत्री इशाक डार यांनी येत्या काही दिवसांत पुन्हा वाटाघाटीचा मार्ग शोधण्याचा आशावाद प्रकट केला आहे; पण वातावरण अत्यंत तणावपूर्ण आहे. उभय देशांच्या मागण्या एकमेकांशी मुळातच विसंगत असून, त्यामागे खोलवर रुजलेला अविश्वास आहे. इराणने युरेनियम संवर्धन पूर्णतः बंद करणे, मोठे संवर्धन प्रकल्प बंद करणे आणि अमेरिकेला तपासणीची परवानगी देणे, या तीन 'लाल रेषा' अमेरिकेने आखल्या होत्या. इराणने त्या अमान्य केल्या. आता अमेरिका इराणवर पुन्हा मर्यादित हल्ले करण्याचाही विचार करत असल्याचे वृत्त आहे; तथापि, इराणी जमिनीवर लष्कर उतरवणे हे अत्यंत धोकादायक पाऊल ठरेल.

इराणचा भूगोल, लोकसंख्या आणि क्रांतिकारी रक्षक दलाचे (आयआरजीसी) जाळे पाहता, लष्कर उतरवणे म्हणजे अफगाणिस्तान आणि इराकमधील चुकांची पुनरावृत्ती ठरेल. शिवाय त्यामुळे इराणमध्ये राष्ट्रवादाची लाट उसळून, सध्याची राजवट कमकुवत होण्याऐवजी जनतेचा पाठिंबा मिळवू शकते. इराणी राजवट उलथवण्याचे स्वप्न वास्तवात आणणे सोपे नाही. इस्रायल, अमेरिकेच्या हल्ल्यांमुळे इराणचे लष्करी नुकसान झाले असले तरी, राजकीय रचना अजूनही एकसंध दिसते.

## संस्कृत सुभाषित

वासनाना क्षयश्चात स्वाध्मासापनमं करू

अर्थ – मन निरंतर स्वस्वरुपीच राहून लयास जाते आणि त्यामुळेच वासनांचा क्षय होतो. म्हणून मनोविजय प्राप्त कर असे सांगितले आहे.

## गुरु वचन

### सुखी जीवनाची चार सुत्रे

जगातल्या कुठल्याही प्रश्नावर समाधान नाही असे होऊच शकत नाही. त्यात मानव तर विशेष शक्तींचा धनी आहे. जर मानवाकडे निष्ठा व प्रयत्न करण्याची तयारी असेल तर सर्व शक्य आहे. जीवनाला उपयुक्त बनवण्याचे अनेक उपाय आहेत. त्यापैकी चार गोष्टी अशा आहेत, ज्याचा जीवनात समावेश केल्यामुळे बहुतांशी अडचणी सुटू शकतात. या चार गोष्टींना जीवनाचे सार म्हटले जाऊ शकते. सर्व विकारांचा त्याग, कपट सोडून साधेपण स्वीकारणे, बंधनातून मुक्त होण्याचे साहस व जीवनात अध्यात्मवादाचा समावेश केला तर मानवाचे व्यर्थ जीवन उपयुक्त बनेल. त्याच्या जीवनात आनंद व उल्हास, शांती व समाधानात वाढ होईल.

विकार मानव जीवनातील सर्वात मोठा अडथळा आहे. हा दोष मानवाला फक्त विकृती देतो. मानवास उदारता, दान, दया, प्रेम किंवा करुणा प्रवृत्तींपासून वंचित करतो म्हणून त्याच्या भौतिक इच्छा एवढ्या वाढतात की, संग्रह करण्यात त्यास योग्य–अयोग्य, कर्तव्य–अकर्तव्य, आपले–त्रयस्थ, शोषण–पोषण कशाचेच भान राहत नाही. आपला फायदा व मोहासमोर त्यास सर्व आदर्श, सर्व मर्यादा व धोरणं व्यर्थ वाटू लागतात. अशा विकारी मानवाच्या जीवनात शोक–संताप व अशांती, असंतोषाशिवाय दुसरे काय मिळू शकते? विकृती मानवाचा फार मोठा दोष आहे, याचा त्याग केला पाहिजे. उदारता व महानतेची वृत्ती मानवासाठी दोन अलंकार मानले गेले आहेत. ते अंगीकारण्यातच त्याचे भले आहे. उदारतेचा गुण आपल्या इतर गुण त्यागांना प्रोत्साहित करतो. त्याग तपश्चर्यापेक्षा कमी नसतो. त्यागी पुरुष कुठल्याही वस्तुचा संग्रह, धोरण व आदर्शाविरुद्ध नाही. उदारता परमार्थासाठी अर्जित केली जाते. उदार पुरुष निती नियमाने मिळवलेल्या पैशाने सुखी व समाधानी असतो. अशा लोकांचे प्रश्न आपोआप सुटतात.

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ११९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 6 | | | 9 | |
| | 4 | 7 | | 8 | | 3 | 1 | |
| | 1 | | | 7 | 4 | 5 | | 2 |
| | | 5 | | | | | 2 | 7 |
| 2 | | | 9 | 3 | 7 | | | 5 |
| 4 | 7 | | | | | 1 | | |
| 6 | | 2 | 1 | 9 | | | 7 | |
| | 9 | 8 | | 4 | | 2 | 5 | |
| | 5 | | | 2 | | | | |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ११८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 8 | 4 | 3 | 2 | 1 | 5 | 9 | 7 |
| 1 | 5 | 9 | 6 | 4 | 7 | 2 | 8 | 3 |
| 2 | 3 | 7 | 5 | 8 | 9 | 6 | 4 | 1 |
| 5 | 9 | 6 | 8 | 1 | 2 | 7 | 3 | 4 |
| 4 | 1 | 8 | 7 | 6 | 3 | 9 | 2 | 5 |
| 7 | 2 | 3 | 9 | 5 | 4 | 8 | 1 | 6 |
| 9 | 4 | 5 | 2 | 3 | 6 | 1 | 7 | 8 |
| 8 | 7 | 1 | 4 | 9 | 5 | 3 | 6 | 2 |
| 3 | 6 | 2 | 1 | 7 | 8 | 4 | 5 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस



### आंतरराष्ट्रीय

- २००६ – इंडोनेशियात रेल्वे अपघातात १२ जण ठार झाले.
- २००७ – थायलंडच्या दक्षिणी भागात दोन धबधब्यांमध्ये आलेल्या पुरात २१ जणांचा मृत्यू झाला.

### राष्ट्रीय

- २००६ – मोहाली पंजाबचा १८ वा जिल्हा बनला.
- २००६ – सीबीआयच्या एका विशेष न्यायालयाने चारा घोटाळयाशी संबंधीत एका प्रकरणात ३१ आरोपींना शिक्षा सुनावली.


### जन्म

- १४६९ – शीख समुदायाचे पहिले गुरु गुरुनानक यांचा जन्म.
- १९६३ – मनोज प्रभाकर हे भारतीय अष्टपैलू खेळाडूंचा जन्म.

### निधन

- १८६५ – अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचा राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन.
- २००६ – मेघश्याम माळी, मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांचे स्वीय सहाय्यक.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ११९



**आडवे शब्द**

३. मैत्रीण
७. छोटे नगर
९. जमाखर्चाचे सरकारी नियोजन
१०. सनसनाटी
१३. उत्तराधिकारी
१४. वाम, दुय्यम
१५. खेळात, युद्धात या दोन्हीपैकी एकाचा स्वीकार करावाच लागतो
१७. तृण
१९. चोप
२०. छोटा दगड
२१. स्वामी
२२. नवीन, ताजा
२३. धमनी
२४. तळे
२५. मनुष्य
२७. दत्ताची मुखे
२८. हिरमोड
३०. पाणी
३१. माळ
३३. अंगणात केलेले पाण्याचे शिंपण
३४. स्वच्छ
३५. कष्टमय
३६. लोभ
३८. मोलकरीण
३९. त्वचा
४०. लोभ, वखवख (हिंदी)
४३. वधू
४५. भस्म
४६. फिरणे
४८. भेकड
५१. दफनभूमी
५२. पती
५४. मिठी
५५. उन्मात्तपणा उपयोगाचा नाही हे सांगणारी एक म्हण– '----- खाली'
५६. वाईट सवय
५८. आश्चर्य
६०. ---- महावीर– जैनांचे तीर्थंकार
६३. मोठेपणा, अष्टसिद्धीपैकी एक
६५. जसा
६७. व्यभिचारी
६८. धष्टपुष्ट
६९. अंत:करण
७१. बातमी, वार्ता
७२. पूर्ण भरतीची वेळ
७३. सौम्य धोरण
७४. लटका, खोटा
७७. चक्र
७८. पुढारी
७९. आसक्ती नसलेला
८०. अवाक्षर
८१. कापसाचे बी
८२. गणपती

**उभे शब्द**

१. अस्सल 'पुणेरी' पेठ
२. वस्त्र
३. सुकुमार
४. अग्नी
५. भावनाप्रधान
६. अपमान
८. मिरवणूक
१०. अफूचे बी
११. मोठा (हिंदी)
१२. हात
१६. मराठीत व्हिटॅमिन
१७. सर्दी झाल्यावर घ्यायचा चहा
१८. काया
१९. विचार
२१. शुभ्र
२२अ. बाजू घेणे
२३. वस्तू, पर्वत
२४. शाप
२६. बटाट्याचा लोकप्रिय पदार्थ
२९. मोडणे
३०. वजनदार
३२. कूपमंडूकांचा आवाज
३५. दुष्ट
३७. रान
३९. शर्करा
४१. पावसाची झड
४२. ताकात केली जाणारी पालेभाजी
४४. पुन्हा पुन्हा
४५. उसाचा घट्ट रस
४६. अग्नी
४७. ख्रिस्ती भिक्षुणी
४९. काढलेले कुबड
५०. देव्हाऱ्यातील कृष्णमूर्ती
५१. नवरदेवाची धाकटी बहीण
५३. भूपाळीतील कृष्ण
५७. टिकाव, टिकून राहणे
५९. शेवट
६१. मोठेपणा
६२. पुर
६४. मोकळा
६६. खोटे बोलणे
६७अ. प्रसिद्धी, कीर्ती
७०. प्रजा
७२. कसदार
७५. काव्य करणारा
७६. चाकू
७८. प्रामाणिकपणा

### जम्बो शब्दकोडे क्र. ११७ चे उत्तर

**आडवे उत्तर :** २.बातमीदार ६.थकवा ९.गो १०.विनामूल्य ११.खडाजंगी १३.रुसवा १५.कढ १७.हेर १८.गतप्राण १९.गीत २१.हल २२.दायित्व २३.खीळ २४.नश्वर २५.नीरवता २७.रत २८.तरबेज ३१.कायम ३२.पथ ३३.दिल्ली ३४.कामला ३७.मारामारी ४०.नकार ४२.जिकीर ४४.वाखणाणी ४६.क्ष किरण ४७.बारव ४८.वचक ५०.निखारा ५२.वरण ५३.वनिता ५४.बाणेदार ५६.जखमी ५७.सदाशिव ५८.सीमा ५९.जामात ६१.नवमी ६३.टापू ६५.थारा ६७.हाव ६८.राग ७१.तर्क ७२.तिढा ७३.घन ७५.रास ७७.जनगणना ७९.अवगत ८०.लकब ८१.कमी ८२.रूढी ८३.अंग ८४.जरा ८५.अस्ताचल

**उभे उत्तर :** १.अनाकलनीय २.बाल्य ३.मीठ ४.रखरखीत ५.भुजंग ७.करुण ८.वास १०अ.मूढ १२.गीतकार १४.वागीश्वरी १६.दयिता २०.तर २२.दाव २६.रममाण २७.रथ २८.तल्लीन २९.बेकार ३०.जम ३१.कालवा ३२.परीक्षक ३५.लाजिरवाणे ३६.शेर ३८.राणीव ३९.निरवानिरव ४१.कारखानदार ४३.कीव ४५.खातरजमा ४९.चपखल ५१.आरमार ५४.बावटा ५५.दासी ५९.जागतिक ६०.तथा ६१.नवरा ६२.मीरा ६४.पूतना ६६.राघव ६९.गजबज ७०.सुगम ७४.नगर ७६.सलग ७८.सामील ७९.अढी ८१.कच

## उपदेशकथा

### लोभ

लोभापायी माणूस अनेक वस्तूंचा संग्रह करतो. एक गावात एक जोडपे होते. पन्नास वर्षाच्या संसारात त्यांनी निरनिराळ्या खूप वस्तू साठवल्या होत्या. घरातील अडगळीची खोली अनेक प्रकारच्या सामानाने भरली होती. एकदा त्या दोघांची सर्व निरुपयोगी वस्तू लोकांना वाटून टाकायचे ठरवले. आसपासच्या पाच–सहा गरजू लोकांना बोलावले व सांगितले, 'या खोलीतल्या हव्या त्या वस्तू तुम्ही घरी घेऊन जा, फक्त त्या वस्तू एकदा आम्हाला दाखवा.' त्या लोकांना फार आनंद झाला. त्यांनी भराभर एकेक वस्तू बाजूला काढली. हातातली वस्तू ते दोघांना दाखवत. पण ती वस्तू पाहून, 'ही नको, ही उपयोगाची आहे' असे म्हणत परत काढत. असे करता करता सर्व वस्तू त्यांना उपयोगाच्या वाटल्यामुळे त्यांनी त्याच माणसांकडून दुसऱ्या खोलीत त्या नीट रचून ठेवल्या. शेवटी दोन चपलांचे जोड शिल्लक राहिले. 'आता हे तरी घेऊ का?' असे त्या लोकांनी उपहासाने विचारले त्यावर त्या बाईंनी सांगितले, 'घ्या. पण फक्त डाव्या पायातल्या घ्या. पण फक्त डाव्या पायातल्या घ्या. कीडा–विंचू घरात शिरला तर उजव्या पायातल्या चपलेनश्रे मारायला सोपे जाते.'

## : SMS :

Ramu: Sir, mere ghar mein TV chodke baaki sabki chori hogayi hai?
Police: chor ne sirf TV kisliye chodaa hoga?
Ramu: mujhe kya pataa sir? main us samay TV mein serial dekh rahaa thaa.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.८ | २५.९ |
| अहमदनगर | ३६.७ | २४.६ |
| अकोला | ४०.२ | २४.७ |
| अमरावती | ३९.४ | २५.३ |
| बीड | ४२ | २६.१ |
| भंडारा | ४२ | २७.३ |
| बुलढाणा | ३२.३ | १७.३ |
| चंद्रपूर | ४४.१ | २५.९ |
| चेन्नई | ४२.२ | २९.८ |
| नवी दिल्ली | ३२.६ | २० |
| धुळे | ३८.५ | २३.३ |
| गोंदिया | ४०.१ | २६.२ |
| जळगाव | ३९.६ | २५ |
| कोल्हापूर | ३७.६ | २३.८ |
| लातूर | ३७.५ | २६.५ |
| मुंबई | ३५.९ | ३१.७ |
| नागपूर | ३९.३ | २४ |
| नांदेड | ३९.८ | २५.८ |
| नंदूरबार | ३६.४ | २४ |
| नाशिक | ३६.८ | २०.८ |
| पुणे | ३५.६ | २३.३ |
| पंढरपूर | ४० | २८.१ |
| सातारा | ३८.६ | २२ |
| सांगली | ३८.४ | २५.१ |
| सोलापूर | ४०.८ | २८.९ |
| वर्धा | ४०.३ | २३.५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा :पश्चिम प्रतिष्ठित व्यक्तींची भेट फायदेशीर ठरणार आहे.

**वृषभ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: उत्तर आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील.

**मिथुन :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: पश्चिम कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. कौटुंबिक सहकार्य कमी प्रमाणात मिळेल.

**कर्क :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण प्रत्येक क्षेत्रात आपल्याला मान सन्मान मिळेल. शांत व विवेक बुद्धीने काम केल्यास यश मिळेल.

**सिंह :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पूर्व व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल.

**कन्या :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा: उत्तर व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. लोकप्रियता वाढणार आहे.

**तुळ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत.

**वृश्चिक :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा:पूर्व चैन करण्याकडे ओढा राहील. व्यापारात नवीन संबंध फायदेशीर ठरतील. वहान चालवतांना काळजी घ्या.

**धनु :** शुभ रंग :निळा,शुभ दिशा:पश्चिम आर्थिक बाबतीमधील प्रकरणे सुरळीत पार पडतील. आजचा दिवस शुभ आहे.

**मकर :** शुभ रंग:लाल,शुभ दिशा: उत्तर प्रभावशाली व्यक्तित्वामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल.

**कुंभ :** शुभ रंग:हिरवा, शुभ दिशा:दक्षिण जीवनात नवीन संधी निर्माण होईल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत.

**मीन :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:गर ११:२७:१७ |
| १५ एप्रिल २०२६ | करण:वणिज २२:३१:२५ |
| बुधवार | सूर्य:मेष |
| विक्रम संवत्– २०८२ | चन्द्र:मीन०९:३७:१७ |
| चैत्रशके संवत्– १९४८ | हिजरी सन् – १४४६ |
| संवत्सर –पराभवनाम | मुस्लिम मास – शव्वाल |
| अयन– उत्तरायणारंभ | तारीख – २६ |
| मास– चैत्र | विशेष |
| ऋतु– सौर वसंत | प्रदोष |
| कृष्ण पक्ष | शिवरात्री |
| तिथि:त्रयोदशी २२:३१:२५ | श्री अक्कलकोट स्वामी |
| नक्षत्र:पूर्वाभाद्रपद | महाराज पुण्यतिथी |
| १५:२२:२५ | संत गोरोबा काका |
| योग:ब्रह्म १३:२४:४३ | पुण्यतिथी |

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आंबेडकर जयंतीनिमित्त पुण्यात 25 हजार ताक पाकिटांचे वाटप

पुणे (दैनिक संध्या) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सकल जैन संघ, पुणे यांच्या वतीने पुणे स्टेशन रोड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात अनुयायांसाठी विनामूल्य ताक व पिण्याच्या पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करण्यात आले. “मानव सेवा परमो धर्म... सर्व धर्म समभाव” या उदात्त उद्देशाने आयोजित या उपक्रमाचे उद्घाटन पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, राज्यमंत्री चंद्रकांत पाटील आणि आमदार माधुरी मिसाळ यांच्या हस्ते करण्यात आले. कडक उन्हाच्या पार्श्वभूमीवर थंडगार ताक मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंदाचे भाव पाहायला मिळाले. या उपक्रमांतर्गत सुमारे २५ हजारांहून अधिक ताकाच्या पाकिटांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला सकल जैन संघाचे अध्यक्ष अचल जैन, हरेश शहा, प्रतीक मालू, अनिल गेलडा, समीर जैन, ललित गुंदेशा, सतीश शहा, विनोद सोलंकी, संदीप पारेख, मुकेश छाजेड, गौतम छाजेड, बालचंद्र कटारिया, अल्पेश गोगरी, निलेश शहा, पंकज नवलखा, नरेंद्र रामशीना, सुशील राठोड तसेच समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमामुळे सामाजिक ऐक्य आणि सेवाभावाचा संदेश देत आंबेडकर जयंतीचा उत्सव अधिक अर्थपूर्ण ठरला.



### नितीनभाऊ गोरे यांच्यामुळे गाजले स्वच्छता अभियान

पुणे (दैनिक संध्या) : देवाच्या आळंदीची जीवन वाहिनी असलेल्या पवित्र इंद्रायणी नदीच्या स्वच्छतेसाठी लोकचळवळ उभारण्याची नितांत गरज असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य तथा चाकण नगरपरिषदेचे शिवसेनेचे गटनेते नितीनभाऊ गोरे यांनी स्वच्छता अभियानात भाग घेतल्याने हे अभियान प्रचंड गाजले. देवाची आळंदी नगरपरिषद आणि श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आळंदी येथे ‘इंद्रायणी नदी स्वच्छता अभियान’ मोठ्या दिमाखात राबविण्यात आले. एकादशीच्या शुभमुहूर्तावर सिद्धबेट येथील इंद्रायणी घाटावर हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. गटनेते नितीनभाऊ गोरे म्हणाले की,“ पवित्र इंद्रायणी नदीच्या स्वच्छतेसाठी सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे. नदी स्वच्छ, सुंदर व टवटवीत ठेवण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. त्यामध्ये प्राधान्याने नागरिकांचा सक्रिय सहभाग असणे अपेक्षित आहे. तरच स्वच्छता अभियान पूर्णत्वास जाण्यास मदत होईल. पर्यावरण संवर्धनासाठी लोकसहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. इंद्रायणी नदीचे पावित्र्य राखण्यासाठी सर्वांनी प्लॅस्टिक व इतर प्रदूषकांपासून नदीला दूर ठेवण्याचा संकल्प केला पाहिजे. इंद्रायणी नदीच्या स्वच्छतेसाठी भविष्यातही सातत्याने स्वच्छता अभियानां सारखे नवनवीन उपक्रम राबवून त्यास लोकचळवळीचे स्वरूप दिले जाणार आहे." याप्रसंगी आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे विश्वस्त पुरुषोत्तम महाराज पाटील, पर्यावरण प्रेमी, सर्व नगरसेवक व या भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. "खेडचे माजी आमदार स्व. सुरेशभाऊ गोरे यांचे बंधू व चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक नितीनभाऊ गोरे यांनी इंद्रायणी घाटावर स्वतः स्वच्छता मोहिमेत भाग घेतल्याने आळंदीकरांच्या भुवया उंचावल्या आहेत. आधी केले मग सांगितले, हे ब्रीद सत्यात उतरवणारे गोरे यांच्या कामामुळे स्वच्छता मोहिमेला वेग आला आहे."

# अग्निसुरक्षा व आय ओ टी विषयावर कापसे यांचे मार्गदर्शन



**पुणे (दै. संध्या)**

फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडिया (एफएसएआय) पुणे चॅप्टरच्या वतीने स्पार्क्ड सिरीज सत्र ३ अंतर्गत "भविष्यातील अति उंच इमारतींची अग्निसुरक्षा आणि आयओटीची (इंटरनेट ऑफ थिंग्ज) उभारणी या विषयावर यशस्वी प्रशिक्षण सत्राचे आयोजन सीओईपीचे भाऊ इन्स्टिट्यूट ऑफ इनोव्हेशन आंत्रप्रेन्योरशिप, सीओईपी, पुणे येथे करण्यात आले.या सत्राचे मार्गदर्शन कापसे कन्सल्टंटचे मुख्य सल्लागार श्री विनोद कापसे यांनी प्रभावीपणे केले.

या वेळी फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडिया (एफएसएआय) पुणे चॅप्टरच्या अध्यक्षा श्रीमती सुजल शहा, श्रीमती सिंपल जैन (अध्यक्ष-निर्वाचित) श्री सागर मुनीश्वर (सचिव). श्री प्रसाद एन (प्रायोजक), श्री विनोद कापसे (कापसे कन्सल्टंटचे मुख्य सल्लागार), श्री बी. एस. कापसे (विभागीय अग्निशमन अधिकारी, एमआयडीसी हिंजवडी), श्री समीर शेख (पुणे अग्निशमन दलविनायक जोगळेकर. सरिता मोरे श्री उमेश संधानशिव (अग्निशमन अधिकारी, एमआयडीसी हिंजवडी), कार्यक्रमाचे संयोजक केदार देशमुख ,सभासद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुजल शहा यांनी सर्वांचे स्वागत केले .संस्थेविषयी माहिती देतांना त्या म्हणाल्या “२००२ साली सुरक्षित भारत साध्य करण्याच्या दृष्टिकोनातून स्थापन झालेल्या फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडियाची भारतात २६ केंद्र असून विविध क्षेत्रातील नऊ हजारहून अधिक सभासद समाजामध्ये अग्नी सुरक्षा विषयी जागृती निर्माण करण्याचे कार्य करत आहेत. विविध उद्योगातील महिला कर्मचारी,शालेय विद्यार्थी,पोलीस यांना आग सुरक्षिततेचे प्रशिक्षण,फायर ऑडिट चर्चा सत्रे, कार्यशाळा,उत्तेजनार्थ पुरस्कार अशा अनेक मार्गाने राष्ट्रीय स्तरावर काम करत आहे.” भारतील सर्व केंद्रामध्ये पुणे केंद्राला प्रथम पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.

श्री विनोद कापसे म्हणाले “आगीपासून इमारतीचे व अडकलेल्या लोकांचे सरंक्षण करणे या साठी समग्र दृष्टीकोण ( होलिस्टिक ओप्रोचे) ठेवणे आवश्क असते. आगी पासून सुरक्षितता करणे हा समग्र दृष्टीकोण अपघात अथवा आगीच्यावेळी सुरक्षा व्यवस्था इमारतीचा नकाशा तयार करताना जिन्याची जागा,लिफ्ट, रहिवाशी संख्या, स्लॅब,पंप हाउस, रेन हर्वेस्टिंग पाइप अपघात अथवा आगीच्यावेळी सुरक्षा व्यवस्था याचा विचार होणे आवश्यक असते.आगीने होणाऱ्या लोकांपेक्षा आगीच्या धुरात अनेक विषारी पदार्थांचे मिश्रण असल्याने मृत्यू होण्याचे प्रमाण अधिक आहे. उंच इमारती मधिल काच तडकणे, स्लॅबची जाडी,अलार्म व्यवस्था, फायर वॉल्स,उष्णता पसरणे,धूर नियंत्रण सुरक्षा यंत्रणा अशा विविध विषयांवर त्यांनी आपले विचार मांडले “.

सुमारे दीड तास चाललेल्या या सत्रात श्री. कापसे यांनी आपल्या सखोल ज्ञानाचा व व्यावहारिक अनुभवाचा उत्कृष्ट संगम साधत 120 हून अधिक प्रतिनिधींना प्रभावीपणे गुंतवून ठेवले.त्यानंतर झालेल्या एक तासाच्या प्रश्नोत्तर सत्रात सहभागींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला, ज्यामुळे विषयाची अधिक सखोल समज निर्माण झाली. त्यांच्या सत्राचा समारोप उपस्थितांच्या उभ्या टाळ्यांच्या गजरात झाला, ज्यातून त्यांच्या प्रभावी सादरीकरणाची प्रचिती आली.

बी .एस .कापसे म्हणाले “आता जगातील बहुतेक क्षेत्रे इंटरनेटने जोडली असल्याने आय ओ टी यंत्रणा काळाची गरज ठरलेली आहे. पंप हाउस हे माणसाच्या हृद्याप्रमाणे काम करत असल्यामुळे त्याचे उत्तम व्यवस्थापन व देखभाल ठेवणे हे गरजेचे असते. परंतु दुर्देवाने डीझेल नसणे, बॅटरी चार्ज नसणे,स्वीच बंद असणे अशा गोष्टीमुळे आग आटोक्यात आणण्यात अडथळे येतात व खूप हानी होते. महाराष्ट्र शासनाने या साठी कायदे केले असून त्याचे पालन होणे गरजेचे आहे.”

समीर शेख म्हणाले “माणसाचा जीव हा फार मौल्यवान असतो. जागेचा ताबा घेताना सुरक्षा यंत्रणेची कार्य पद्धती समजून घ्या व आपला मृत्यू कोणाच्या हातात देऊ नका. कष्टाने उभारलेले घर जळणे अथवा घटनेत मृत्यू होणे या गोष्टी फार वेदनाकारक असतात. आय ओ टी यंत्रणेद्वारे पम्प हाउसची सर्व माहिती सभासद, वर्किंग कमिटी अथवा वार्षिक देखभाल करणाऱ्या संस्थेला मिळत असते.या मुळे खूप भांडवल खर्च करून केलेले उद्योग,गृहरचना येथील आगीने होणारे मालमत्ता नुकसान व मनुष्य हानी टाळता येईल.”

श्री प्रसाद निश्तला यांनी सुरक्षितते मध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर असलेल्या उत्पादनाविषयी माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्र संचालन आस्था चौधरी ,मधुरा हेम्बडे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री सागर मुनीश्वर यांनी केले. हा अत्यंत संवादात्मक कार्यक्रम पुणे अध्यायाच्या दर्जेदार ज्ञानवितरण व उद्योगातील नेतृत्वाच्या बांधिलकीला पुन्हा एकदा अधोरेखित करणारा ठरला.

## चाकण एमआयडीसीतून तरुणाचे अपहरण; सहा जणांची टोळी जेरबंद

**पुणे (दै. संध्या)**

चाकण औद्योगिक क्षेत्रात गुन्हेगारांचे धाडस कमालीचे वाढत चालले असून, खेड तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातील वासुली गावच्या हद्दीतील 'अमेझॉन' कंपनीच्या गेटसमोरून एका तरुणाचे अपहरण करून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणात उत्तर महाळुंगे पोलिसांनी सहा जणांना सोमवारी पहाटे जेरबंद केले. समर्थ उर्फ सोन्या माणिक तावरे यांनी याप्रकरणी उत्तर महाळुंगे पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. सागर बाळू जावळे (वर्षे ३४ वर्षे, रा. कुरकुंडी, ता. खेड), नितीन संजय थिटे (वय २० वर्षे, रा. रेटवडी), सौरभ ऊर्फ सोन्या अनिल ढोरे (वय २८ वर्षे, रा. वरची भांबरवाडी), अजय भरत गोपाळे (वय २३ वर्षे, रा. अहिल्यादेवी चौक, खंडोबामाळ, खेड), कुणाल प्रशांत चव्हाण (वय २३ वर्षे, रा. अहिल्यादेवी चौक, खंडोबामाळ, खेड) व ओमकार दशरथ कोरडे (वय २४ वर्षे रा. सांडभोरवाडी ता. खेड) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. तर या गुन्ह्यात सामील असलेल्या एका विधीसंघर्षित बालकावर देखील कारवाई करण्यात आली आहे.

## अभिनेता पवन चौरे ‘पिक्चर बॉईज’मधून थिएटरमध्ये झळकणार

**पुणे (दै. संध्या)**



अभिनय क्षेत्रात हिरो होण्याचं स्वप्न हे प्रत्येकाचं असत. परंतु प्रत्येकालाच हे स्वप्न पूर्ण करता येईल हे अजिबात सांगता येत नाही. एका खेड्यातून येऊन मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर एका तरुणाने त्याचे स्वप्न हे प्रत्यक्षात उतरवले आहे. ‘ZEE5 वरील अंधा प्यार 2.0’ या वेबसिरीज मधून घराघरात पोहचलेला अभिनेता पवन चौरे आता रुपेरी पडद्यावर झळकण्यास सज्ज झाला आहे. येत्या मे पासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणाऱ्या "पिक्चर बॉईज’ या चित्रपटात आपल्याला त्याची महत्वपूर्ण भूमिका पाहायला मिळणार आहे. त्रिमूर्ती फिल्म्सनं 'पिक्चर बॉईज' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. रवी पांडुरंग पंडितपवार, राजा पांडुरंग पंडितपवार हे या चित्रपटाचे निर्माते असून शिवाजी केशव पाटील हे सहनिर्माते आहेत. चित्रपटाची कथा, पटकथा, संवादलेखन आणि दिग्दर्शन निलेशसिंह राजपूत यांनी केलं आहे. एका खेड्यातून आलेल्या तरुणासाठी हा प्रवास खूप अभिमानास्पद आहे. माझ्या कुटुंबाचा, मित्रांचा आणि प्रेक्षकांचा पाठिंबा नसता तर हे शक्य झालं नसतं. मला माझं नाव खूप मोठं करायचं आहे. म्हणतात ना, स्वप्न पाहिली की ती नक्की पूर्ण होतात आणि मी माझी स्वप्नं नक्की पूर्ण करणार. आगामी काळातही प्रेक्षकांचे असेच प्रेम आणि आशीर्वाद मिळत राहतील, अशी अपेक्षा असल्याचे अभिनेता पवन याने सांगितले. अभिनयाबरोबरच मी कलरीपयट्टू, जिम्नॅस्टिक्स आणि कुस्ती यांसारख्या कला देखील शिकत आहे. या नव्या गोष्टी स्वतःमध्ये आत्मसात करताना मला खूप अभिमान वाटतो आणि त्याचा मला माझ्या कामातही फायदा होत आहे असे त्याने आवर्जून सांगितले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पुण्यात भव्य संयुक्त अभिवादन सोहळा

**लोकप्रतिनिधींनी वाहिली आदरांजली**

**पुणे (दै. संध्या)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ‘भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती मध्यवर्ती समिती’च्या वतीने पुणे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात सकाळी १० वाजता भव्य ‘संयुक्त अभिवादन’ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यात राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांनी एकत्र येत महामानवाला अभिवादन केले. या कार्यक्रमास राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार बापूसाहेब पठारे, आमदार चेतन तुपे आणि माजी आमदार मोहन जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच पुणे महानगरपालिकेच्या महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, गणेश बिडकर, नगरसेवक निलेश आल्हाट, ज्येष्ठ नेते बाळासाहेब जानराव, रिपाई शहराध्यक्ष संजय सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष श्रीकांत पाटील, मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे, महिपाल वाघमारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी विभागीय आयुक्त चंद्रकांत कुंडलवार आणि समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांच्यासह विविध शासकीय अधिकाऱ्यांनी डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यक्रमाची सुरुवात बँड पथकाच्या मानवंदनेने झाली. त्यानंतर बौद्ध भिक्षूंच्या उपस्थितीत सामूहिक बुद्ध वंदना व भीमस्तुती सादर करण्यात आली. शेवटी राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन मध्यवर्ती समितीचे अध्यक्ष राहुल डंबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या सोहळ्यासाठी राहुल नागटिळक, विठ्ठल गायकवाड आणि समितीच्या इतर पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.




# गुन्हेगारांचा कर्दनकाळ सिंघमची लक्ष्मीनगरात एन्ट्री, अवैध धंद्याच्या गराड्यात कदमांचा दरारा

**हद्दीतील दारूभट्ट्या उध्वस्त करण्यात यश**

**पुणे (दै. संध्या)**

अवैध धंद्यासह गुन्हेगारांचे कर्दनकाळ म्हणून ओळखले जाणारे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र कदम यांची लक्ष्मीनगर पोलिस स्टेशनमध्ये एन्ट्री होताच संबंधित हद्दीतील दारूभट्ट्या उध्वस्त करून गंभीर स्वरूपातील गुन्हेगारांवर वचक बसविण्यात त्यांना यश आल्याने परिसरातील नागरिकांना चित्रपटातील नव्हे तर खऱ्या खाकी वर्दीतील सिंघमचे रूप पाहायला मिळत आहे.

आज सर्वसामान्य जनतेचा खाकी वर्दीतील जनतेचे रक्षक म्हणून पाहिल्या जाणाऱ्या पोलिस यंत्रणेकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असून समाजातील अनेकांनी पोलिस यंत्रणा विरोधात आंदोलने छेडण्याचे प्रकार आपण समाजात पाहत आहे. याबरोबरच अनेक हिंदी, मराठी चित्रपट दिग्दर्शकांनी आपला आता मोर्चा या क्षेत्राकडे वळून अनेक नामांकित चित्रपट यावर येऊन गेले असून यातील टायगर, गंगाजल, सिंघम यासारखे नावाजलेले चित्रपट तर प्रेक्षकांनी डोक्यावर घेतले असतानाच चार महिन्यापासून येरवडा परिसरातील लक्ष्मीनगर मधील सर्वसामान्य जनता खाकी वर्दीतील खऱ्या खुऱ्या सिंघमचा अनुभव घेत आहे. यापूर्वी अवैध धंद्यासह गुन्हेगारांनी लक्ष्मीनगर भागात डोकेवर काढल्याने परिसरातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. यास कारण देखील तसेच आहे. या भागात घरोघरी दारूभट्ट्या बनून गावठी दारूची खुलेआमपणे विक्री केली जात होती. विशेष करून या अवैध व्यवसायाचा कारभार महिलांच्या हातात असल्याने पोलिस यंत्रणा देखील कारवाईसाठी पुढे सरसावत नव्हती. पण येथील कायदा सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पुणे शहराचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विविध भागात नव्याने पोलिस स्टेशन उभारण्यात आले त्यापैकी एक असलेले लक्ष्मीनगर पोलिस स्टेशनचे नाव आवर्जून घेतले जात आहे.

परिसरात अवैध व्यावसायिक व गुन्हेगारांचा दहशतीमुळे रात्री



सातनंतर कोणी ही रिक्षाचालक या भागातील भाडे घेण्यास त्यांच्या मनात धास्ती निर्माण झाली होती. त्यामुळेच येथील अवैध धंद्यासह गुन्हेगारांवर दरारा निर्माण होण्याच्या उद्देशाने शहर पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी पोलिस निरीक्षक रविंद्र कदम यांच्यावर विश्वास ठेवून पोलिस स्टेशनची सर्व सूत्रे त्यांच्या हातात दिल्याने त्यांचे या ठिकाणी आगमन होण्यापूर्वीच अवैध हातभट्टी विक्रेते व गुन्हेगारांनी धसका घेतला. कारण पुण्यात येण्यापूर्वीच त्यांच्या नावाची चर्चा अधिक होऊन कदम यांनी येथे येण्यापूर्वी विश्रांतवाडी पोलिस स्टेशन येथे गुन्हे शाखा पोलिस निरीक्षक म्हणून कारभार सांभाळला होता. त्यामुळे अनेकांनी त्यांच्या नावाचीच धास्ती घेतली. त्यातच रविंद्र कदम यांनी देखील पोलिस आयुक्तांच्या विश्वासाला तडा जाऊ न देता पोलिस स्टेशनचा कारभार हातात घेताच त्यांनी प्रथम पोलिस स्टेशनमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक तयार करून पोलिस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या गावठी हातभट्ट्या उध्वस्त करण्यास प्राधान्य दिले आहे. ब्रिटिश काळापासून परंपरेनुसार या भागात घरोघरी गावठी दारू बनवून ती विकण्याचा बेकायदेशीर धंदा सुरू असताना अशा धंद्यावर कारवाई करणे म्हणजे कदम यांच्यासमोर एक आव्हानच होते. त्यातच येथील दारूच्या आहारी गेलेल्या अनेक महिलांचे संसार उध्वस्त होऊन परिसरातील अनेक महिला ह्या सासरी नवऱ्याकडून होणाऱ्या अत्याचाराला बळी पडत होत्या. यामुळे याची खंत कदम यांच्या मनाला लागून राहिली होती. त्यामुळे अशा धंद्यांना थारा न देता ते मोडीत काढण्यासाठी त्यांनी या ठिकाणी पोलिस अधिकारी व कर्मचारी यांची फौज बनवून सर्वात प्रथम अशा अवैध धंद्यावर बुलडोझर फिरविण्यात यश मिळविले असले तरी येथील महिलांनी केलेला प्रतिकार देखील मोडीत काढला आहे. विशेष करून परिसरात अनेक महिला ह्या दारुड्या पतीचा होणारा अन्याय हा निमूटपणे सहन करत होत्या.पण सिंघम कदम यांची पोलिस स्टेशनला निवड झाल्याची माहिती महिलांना समजताच त्यांनी मदतीसाठी कदम यांच्याकडे धाव घेऊन आपली व्यथा मांडल्यावर यावर देखील तात्काळ ठोस पाऊले उचलून पोलिस स्टेशनमधील रणरागिणी असलेल्या महिला कर्मचाऱ्यांकडून अशा महिलांना न्याय देण्याचा प्रयत्न केल्याने सध्या रविंद्र कदम हे माता भगिनींच्या गळ्यातील ताईत बनले असून बालगोपालांचे काका,मामाची भूमिका ते सध्या बजावत आहेत. याबरोबरच मध्यंतरीच्या काळात गुन्हेगासराबरोबरच कोयता गँगने परिसरात कहर करून सर्वसामान्य नागरिकांची झोप उडवली होती. त्यामुळे दारूभट्ट्या उध्वस्त केल्यानंतर पोलिस निरीक्षक रविंद्र कदम यांनी आपला मोर्चा अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांकडे वळून त्यांना ताब्यात घेऊन परिसरात धिंड काढून त्यांचा चांगल्या प्रकारे समाचार घेतल्यामुळे आजच्या परिस्थितीत असे गुन्हे केलेले आरोपी हे सातच्या आत घरात जाणेच पसंत करत आहे. त्यामुळे अवैध धंद्यासह गुन्हेगारांनी देखील कदम यांचा चांगलाच धसका घेतला आहे. महिनाभरापूर्वी पोलिस स्टेशनच्या हद्दीत गावठी कट्टे विक्रीसाठी आलेल्या आरोपींना मुद्देमालासह ताब्यात घेऊन त्यांना अटक करण्यात यश आले आहे. यापूर्वी रात्री मध्यरात्री गुन्हेगारास हा दारुड्याचा सुरू असलेल्या धिंगाण्यास वेसण लावण्यास सिंघम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कदम यांना यश येऊन आजच्या परिस्थितीत गेल्या चार महिन्यापासून गंभीर गुन्ह्यातील आरोपींना तडीपार करण्यात त्यांस यश आले आहे. पोलिस स्टेशनच्या हद्दीत जाण्यास अनेक गुन्हेगारांच्या मनात धडकी भरत असली तरी पण बालगोपाल हे कदम यांची आवर्जून भेट घेऊन त्यांच्याशी गप्पागोष्टी मारण्यात दंग होत आहे. हे विशेष त्यातच कोणी बालगोपाल त्यांना साहेब तर कोणी दादा, मामा, काका या नावाने हाक मारत असले तरी पण माता भगिनी ह्या त्यांना सिंघम या नावानेच ओळखत आहेत. त्यास कारण देखील तसेच असून अनेक महिलांचे उध्वस्त झालेले संसार त्यांनी केलेल्या कठोर परिश्रमामुळे बसू लागल्याने या कार्यात ते आनंद मानत आहे.

एवढे कारवाईची ते धाडस करत असताना पोलिस स्टेशनमधील कनिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर कर्मचाऱ्यांची देखील मोलाची साथ त्यांना मिळत आहे. याबरोबरच शहरातील गंभीर गुन्ह्यातील आरोपीकडून अनेकदा वरिष्ठ अधिकाऱ्यांवर हल्ले करण्याचे प्रयत्न झाले आहेत. त्यामुळे भविष्यात जनतेची सेवा करताना एखाद्या हल्लेखोराकडून होण्याची शक्यता असताना ही व धोक्याची घंटा वाजत असताना देखील ते आपल्या कर्तव्याशी ठाम असल्यामुळे आजच्या रडवलेल्या अनेक महिलांच्या डोळ्यातून आनंदाश्रू तरळत आहेत. ते करत असलेल्या कार्यामुळेच ते बजावत असलेल्या भूमिकेमुळे अनेक गंभीर गुन्ह्यातील गुन्हेगार व कोयता गँग मधील आरोपी हे त्यांच्यासमोर नतमस्तक झाले हे विशेष आहे. तर ते करत असलेल्या उत्कृष्ट कार्यामुळे अनेकांनी त्यांच्या बदलीसाठी पाऊल उचलल्याचे देखील समजत आहे. पण समोरचा गुन्हेगार शेर असेल तर कदम हे अशा गुन्हेगारांना पुरून उरले असून त्यांच्यापेक्षा कदम हे वस्ताद निघून सव्वाशेर बनले आहेत. त्यांचा कोणी बदलीसाठी प्रयत्न केल्यास सर्वसामान्य जनतेने कदम यांच्यासाठी सह्यांची मोहीम राबविण्याचे वचन घेतले आहे. त्यामुळे जनतेसाठी सिंघम बनलेल्या पोलिस निरीक्षक रविंद्र कदम यांचा आदर्श तरुण वर्गांनी देखील घेतल्यास हा आदर्श तरुणासाठी प्रेरणादायी ठरेल हे मात्र निश्चित बोलले जात आहे.

सिंघम म्हणून ओळखले जाणारे लक्ष्मीनगर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक हे मूळचे सातारा जिल्ह्यातील असून ते १९९६साली पोलिस सेवेत पोलिस उपनिरीक्षक म्हणून भरती झाले असून आतापर्यंत त्यांनी मुंबई,बांद्रा आदी ठिकाणी आपले कार्य बजावून विश्रांतवाडी पोलिस स्टेशन येथे गुन्हे शाखेचे तर येरवडा वाहतूक विभागात पोलिस निरीक्षक म्हणून काम पाहिले आहे.गेल्या चार महिन्यापासून ते खतरनाक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लक्ष्मीनगर पोलिस स्टेशनमध्ये आपल्या जीवाची पर्वा न करता आपले कार्य निर्भीडपणे बजावत आहेत.हे विशेष.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आंबेडकर जयंतीनिमित्त अल्पोपहार व रोप वाटप

पुणे (दैनिक संध्या) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त रिपब्लिकन पक्षाच्या वतीने अल्पोपहार वितरण तसेच रोप वाटपाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा पुणे स्टेशन येथे झालेल्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या प्रसंगी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, आमदार बापूसाहेब पठारे, सभागृह नेते गणेश बिडकर, रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, प्रदेश उपाध्यक्ष हुलगेश चलवादी, सरचिटणीस महिपाल वाघमारे, सरचिटणीस श्याम सदाफुले, नगरसेविका हिमाली कांबळे, नगरसेवक नीलेश अल्हाट, जयदेव रधवे, निलेश रोकडे, चिंतामण जगताप, सनाबी शेख, हर्षदा गायकवाड, मंगल रासगे, शोभा झेंढे, हनुमंत गायकवाड, मिलिंद चलवादी, अजय थोरात, सुनिल जाधव, बुद्धिशा रंधवे, शशिकांत मोरे, शांतीनाथ चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात नागरिकांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले तसेच पर्यावरणपूरक उपक्रम म्हणून रोपांचे वितरण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा समाजाने अवलंब करावा, असे आवाहन यावेळी केले.

### ऑपरेशन हिमसेतू अंतर्गत भारतीय लष्कराने सिक्कीममधील पर्यटकांची सुटका केली



पुणे (दैनिक संध्या) : भारतीय लष्कराने, बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशन (बीआरओ) आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने, ऑपरेशन हिमसेतू अंतर्गत उत्तर सिक्कीममध्ये अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षितपणे बाहेर काढले. तारामचूच्या पुढे भूस्खलनामुळे रस्त्याचा एक महत्त्वाचा भाग कोसळल्याने, चट्टनकडे जाणारा मार्ग बंद झाला आणि शेकडो पर्यटक अडकून पडले. त्यानंतर हे ऑपरेशन सुरू करण्यात आले. भारतीय लष्कराचे अभियंते त्रिशक्ती सॅपर्स तात्काळ कामाला लागले आणि त्यांनी रस्त्याची दुरुस्ती सुरू केली.

# हवेलीच्या सभापतींचा निर्णय राज्यभर राबविणार

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे



**लोणी काळभोर (दै. संध्या) :**

हवेलीचे सभापती युवराज काकडे यांनी 'मुख्यमंत्री बळीराजा पाणंद व शेत रस्ता' योजनेअंतर्गत पाणंद व शेत रस्त्यांसाठी ग्रामपंचायतींना ग्रामसभा घेणे अनिवार्य केले आहे. या निर्णयामुळे शेतरस्ते आणि पाणंद मार्गांच्या कामांना मोठा वेग मिळणार आहे. बळीराजासाठी हा ऐतिहासिक निर्णय असून, काकडे यांनी मांडलेली ही संकल्पना महसूल विभाग राज्यभर राबविणार असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

लोणी कंद येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबिराचे' आयोजन करण्यात आले होते. यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाला विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत, उपविभागीय अधिकारी यशवंत माने, अपर तहसीलदार तृप्ती कोलते पाटील, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक प्रदीप कंद, हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे, जिल्हा परिषदेचे सदस्य किरण साकोरे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे यांनी पुढाकार घेऊन केलेला हा निर्णय शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारा ठरत आहे. अनेक गावांमध्ये शेतरस्त्यांच्या अभावामुळे होणारा त्रास, मालवाहतुकीतील अडचणी आणि पाणंद रस्त्यांवरील वाद यावर आता ग्रामसभेच्या माध्यमातून थेट तोडगा निघणार आहे. या अभिनव निर्णयाचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कौतुक केले.

प्रदीप कंद म्हणाले, हवेली तालुक्यात मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजनेची कामे प्रगतीपथावर आहेत. ही योजना यशस्वी करण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि प्रशासन मिळून जोमाने काम करत आहेत. महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या सेवांबाबत समाधान व्यक्त करत, येत्या काळात तालुक्यातील नागरिकांच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**हवेलीतील शेतरस्ते व पाणंद रस्ते लवकरच मोकळे होणार?**

हवेली तालुक्यातील अनेक गावांमध्ये पाणंद रस्ते, शिवरस्ते आणि शेतरस्ते अतिक्रमणाच्या विळख्यात अडकले आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये सतत वाद निर्माण होत आहेत. हे वाद कायमचे मिटवण्यासाठी रस्ते मोकळे करणे गरजेचे आहे. आतापर्यंत महसूल विभागाचे प्रयत्न अपुरे पडत होते. मात्र, आता ग्रामपंचायतींचा सक्रिय सहभाग मिळणार असल्याने शेतरस्ते आणि पाणंद मार्ग लवकरच खुले होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## निर्मिती सावंत यांच्या 'भागूबाई'चा धमाकेदार ट्रेलर प्रदर्शित




**मुंबई (दै. संध्या) :**

मराठी चित्रपट सृष्टीतील प्रेक्षकांची लाडकी अभिनेत्री निर्मिती सावंत पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. 'भागूबाई' या चित्रपटात त्या मुख्य भूमिकेत दिसणार असून आज या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला. ग्रामीण महाराष्ट्राच्या रंगतदार पार्श्वभूमीवर आधारित हा चित्रपट २४ एप्रिल २०२६ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट प्रस्तुत 'भागूबाई' या चित्रपटाच्या ट्रेलरमध्ये 'भागूबाई' या खट्याळ, बिनधास्त आणि गप्पिष्ट बाईची मजेशीर दुनिया पाहायला मिळते. छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये नाक खुपसत ती गावात गोंधळ माजवते आणि साध्या घटनांना मोठं रूप देत नात्यांमध्ये गैरसमज निर्माण करते. पण या सगळ्या विनोदामागे एक गंभीर सत्य दडलेलं असल्याची झलकही ट्रेलरमध्ये दिसते. या चित्रपटाचा गाभा म्हणजे निर्मिती सावंत यांची मुख्य भूमिका. त्यांच्या खास कॉमिक टायमिंगसोबतच भावनिक अभिनयाची झलक यात पाहायला मिळते. 'सुपर डुपर' मधील यशानंतर त्या पुन्हा एकदा प्रेक्षकांना आपलंसं वाटेल अशी, मातीशी जोडलेली व्यक्तिरेखा साकारताना दिसणार आहेत. चित्रपटात भार्गवी चिरमुले, शशांक शेंडे, मंगेश देसाई, विजय पाटकर, नागेश भोंसले आणि निखिल चव्हाण यांचा दमदार अभिनय पाहायला मिळणार आहे. भागुबाई चित्रपटाची कथा एका अशा बाई भोवती फिरते, जिला गावातल्या गप्पा आणि कुचाळक्या करण्यात विशेष आनंद मिळतो. मात्र तिच्या आयुष्यात घडणारी एक अनपेक्षित घटना सगळंच चित्र बदलून टाकते. त्या घटनेनंतर तिच्या आयुष्यात आणि गावात काय बदल होतात हे या चित्रपटात पाहायला मिळेल. या चित्रपटाचे दिग्दर्शन संजय अमर यांनी केलेलं असून वास्तवाशी जोडलेली आणि भावनिक स्पर्श असलेली ही कथा प्रेक्षकांना नक्कीच भावेल, तर निर्माती श्रद्धा पटेल यांनी ही कथा प्रेक्षकांपर्यंत भावनिक पद्धतीने पोहोचवण्याचा प्रयत्न केला आहे.

## स्वायत्त, असामान्य आणि जागरूक

**पुणे (दै. संध्या) :**

जेन अल्फा ही डिजिटलदृष्ट्या खोलवर जोडलेली पिढी आहे, जी भारताच्या लोकसंख्येच्या चतुर्थांशाहून अधिक भागाचे प्रतिनिधित्व करते. या पिढीतील 73% मुलांकडे आधीच वैयक्तिक स्मार्टफोनची उपलब्धता आहे आणि 60% मुले लॅपटॉपचा वापर करतात. ही अशी पिढी आहे ज्यांनी तंत्रज्ञानामध्ये स्वातंत्र्याचा अनुभव घेतला आहे. जेनरेशन अल्फाला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी, रुकम कॅपिटलने 'जेन अल्फा डिकोडेड: द कंझ्युमर-ब्रँड डायनॅमिक' हा अनोखा अहवाल सादर केला आहे, जो ते ग्राहक वर्तन आणि ब्रँड एंगेजमेंट कसे नव्याने परिभाषित करत आहेत हे स्पष्ट करतो. अहवालाच्या प्रकाशनावेळी रुकम कॅपिटलच्या संस्थापक आणि मॅनेजिंग पार्टनर अर्चना जहागीरदार यांनी सांगितले: "जेन अल्फा ही भारतातील सर्वात तरुण पिढ्यांपैकी एक आहे, ज्यामध्ये घरगुती खरेदी निर्णयांपैकी 80% पर्यंत प्रभाव टाकण्याची क्षमता आहे. ते डिजिटलदृष्ट्या प्रवीण आहेत आणि कंटेंटपर्यंत अमर्याद प्रवेश आहे, तरीही अल्गोरिदम, मायक्रो-ट्रेंड्स, समवयस्क मान्यता आणि टिकाव व समावेशनासारख्या प्रारंभीच्या मूल्यांनी प्रभावित आहेत.

## फटाकपेची 'प्रीमियर लीग' रेफरल मोहीम सुरू; बक्षिसांची संधी

**मुंबई (दै. संध्या) :**

■ क्रिकेट हंगामात रेफर-अर्न-विन उपक्रम; डिजिटल गोल्डपासून टीव्ही आणि स्कूटरपर्यंत आकर्षक रिवॉर्ड्स्




फिनटेक क्षेत्रातील फटाकपेने क्रिकेट हंगामाच्या पार्श्वभूमीवर 'फटाकपे प्रीमियर लीग' (एफपीएल) ही विशेष रेफरल मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत सहभागी होणाऱ्या वापरकर्त्यांना खात्रीशीर डिजिटल सुवर्ण रिवॉर्ड मिळण्याबरोबरच डिजिटल गोल्ड, टेलिव्हिजन संच आणि स्कूटरसारखी उच्च-मूल्य बक्षिसे जिंकण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या मोहिमेचा एकूण बक्षीस निधी ₹१५ लाखांपर्यंत असल्याचे कंपनीने जाहीर केले आहे.

इंडियन प्रीमियर लीगच्या उत्साहाला जोड देत ही मोहीम २८ मार्च ते ३१ मे २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. क्रिकेटच्या जोशासोबत आर्थिक फायद्याची सांगड घालणारी ही मोहीम वापरकर्त्यांना मित्र व कुटुंबीयांना फटाकपेवर रेफर करण्यास प्रोत्साहित करते. संबंधित व्यक्तीने फटाकपेवर साइन अप करून इन्स्टंट लोन घेणे किंवा 'फटाक उडान' हे उत्पादन सक्रिय करणे आवश्यक आहे. रेफर केलेल्या वापरकर्त्याने कर्ज वितरण प्रक्रिया पूर्ण केली किंवा 'फटाक उडान' सक्रिय केले की तो रेफरल यशस्वी मानला जाणार आहे. प्रत्येक यशस्वी रेफरलला 'रन' म्हणून गणले जाईल. या मोहिमेत वापरकर्त्यांना ठरावीक टप्पे पूर्ण केल्यानंतर खात्रीशीर बक्षिसे देण्यात येणार आहेत. दोन यशस्वी रेफरल्स पूर्ण करणाऱ्यांना ₹१०० किमतीचे डिजिटल सोने, चार यशस्वी रेफरल्स पूर्ण करणाऱ्यांना ₹५०० किमतीचे बक्षीस, तर सहा यशस्वी रेफरल्स पूर्ण करणाऱ्यांना ₹१००० किमतीचे बक्षीस दिले जाणार आहे. याशिवाय, चार आणि सहा यशस्वी रेफरल्सचा टप्पा पार करणारे वापरकर्ते लकी ड्रॉसाठी पात्र ठरणार आहेत. या लकी ड्रॉमधून पाच ३२-इंच टीव्ही संच तसेच टीव्हीएस एनटॉर्क स्कूटर जिंकण्याची संधी मिळणार आहे. कंपनीच्या माहितीनुसार, एक लाख एकूण रेफरल अर्जांचा टप्पा पूर्ण झाल्यानंतरच स्कूटरचे बक्षीस अनलॉक होणार असून त्यामुळे हा समुदायाच्या सहभागावर आधारित महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

फटाकपेचे मुख्य व्यवसाय अधिकारी अभिषेक गांधी म्हणाले, "फटाकपे प्रीमियर लीग भारतातील सर्वात मोठ्या क्रिकेट हंगामाची ऊर्जा आणि सांस्कृतिक गती वापरून रेफरल प्रक्रियेला अधिक उत्साही आणि फायद्याचा अनुभव बनवते. प्रत्येक यशस्वी रेफरल हा सीमारेषा पार केल्यासारखा वाटावा, अशी आमची संकल्पना आहे. आमचे वापरकर्ते त्यांच्या आर्थिक गरजांसाठी फटाकपेची निवड करतातच, पण मित्र-परिवारातही आमच्यावर विश्वास ठेवतात. त्या विश्वासाची दखल घेण्याचा हा आमचा प्रयत्न आहे." कंपनीच्या म्हणण्यानुसार, या मोहिमेमुळे वापरकर्त्यांना डिजिटल गोल्डच्या स्वरूपात खात्रीशीर कमाईची संधी, उच्च-मूल्य बक्षिसे जिंकण्याची शक्यता आणि सोपी रेफरल-आधारित सहभाग प्रक्रिया अशा अनेक स्तरांवर लाभ मिळणार आहेत. त्याचबरोबर, सहभागी वापरकर्ते त्यांच्या ओळखीच्या लोकांना आर्थिक सेवांपर्यंत पोहोचण्यास मदत करू शकणार आहेत. मोहिमेच्या अटींनुसार, केवळ मोहिमेच्या कालावधीत नोंदविण्यात आलेल्या रेफरल्सच ग्राह्य धरले जातील. सर्व बक्षिसे ही पडताळणी करून यशस्वी ठरलेल्या रेफरल्सवर आधारित असतील. रेफर करणारा आणि रेफर झालेला वापरकर्ता या दोघांनीही ॲप इन्स्टॉलेशन, पडताळणी आणि इतर पात्रता निकष पूर्ण करणे आवश्यक आहे.

## नेब्युला बाय टायटनचा अक्षय तृतीये विशेष कलेक्शन

**मुंबई (दै. संध्या) :**

■ १८ कॅरेट सोन्यातील लक्झरी घड्याळांची नवी ओळख

■ परंपरा, कारागिरी आणि आधुनिक डिझाइनचा संगम; २ लाखांवरील खरेदीवर गोल्ड कॉईन ऑफर

अक्षय तृतीयेच्या निमित्ताने नेब्युला बाय टायटनने सोन्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणारे विशेष कलेक्शन सादर केले आहे. १८ कॅरेट शुद्ध सोन्यात तयार केलेल्या या घड्याळांमधून परंपरा, उत्कृष्ट कारागिरी आणि आधुनिक डिझाइन यांचा सुंदर मिलाफ अनुभवायला मिळतो. सोनं केवळ साठवण्यापेक्षा ते अर्थपूर्णपणे वापरण्याची संकल्पना या कलेक्शनमधून अधोरेखित करण्यात आली आहे. या कलेक्शनमधील प्रत्येक घड्याळ हे केवळ दागिना नसून आधुनिक लक्झरीचे प्रतीक आहे. अचूक अभियांत्रिकी, आकर्षक डिझाइन आणि सोन्याची अंतर्गत किंमत यांचा संगम या घड्याळांत दिसून येतो. ही घड्याळे पुढील पिढ्यांना देण्याजोगी वारसा वस्तू म्हणूनही तयार करण्यात आली आहेत. महिलांसाठी सादर केलेल्या कलेक्शनमध्ये नाजूकता आणि ठामपणाचा संतुलित संगम दिसतो. 'मल्लिगाई' या घड्याळात जास्वंद प्रेरित डिझाइन, पर्लसेंट डायल आणि रोझ गोल्ड केस यामुळे ते आकर्षक ठरते. 'वर्षा'मध्ये पावसाच्या थेंबांपासून प्रेरित कन्सेंट्रिक डायल आणि डायमंड सेट ब्रेसलेट प्रकाशाचा खेळ साकारतो. 'लोटस' या मॉडेलमध्ये फिकट निळ्या मदर-ऑफ-पर्ल डायलवर कमळाची नाजूक आकृती असून यलो गोल्ड केस आणि गडद निळा लेदर स्ट्रॅप यामुळे ते उठावदार दिसते. पुरुषांसाठीच्या कलेक्शनमध्ये अचूकता आणि रचनात्मक साधेपणावर भर देण्यात आला आहे. 'आर्ट डेको ऑटोमॅटिक' हे घड्याळ जिओमेट्रिक डिझाइन आणि स्विस ऑटोमॅटिक मूव्हमेंटसह सादर करण्यात आले आहे. 'जेनेसिस ऑटोमॅटिक'मध्ये गिलॉशे डायल, डोडेकॅगोनल बेजल आणि विशेष रोटरमुळे वेगळेपण जाणवते.


## ग्रामपंचायत कोथळे, ता. पुरंदर, जि. पुणे

**B-1 टेडर नोटीस क्र.१ सन २०२६/२७**

ग्रामपंचायत कोथळे, ता. पुरंदर, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा) पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत कोथळे ता. पुरंदर जि. पुणे यांच्याकडुन दिनांक १५/०४/२०२६ ते दिनांक २२/०४/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व पोस्टाने/समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा विक्री करण्याचा कालावधी | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोथळे येथे बंदिस्त गटर करणे १. | २४९०७४/- | दि १५/०४/२०२६ ते दि २२/०४/२०२६ | २३६/- | २४९१/- |
| २ | कोथळे येथे बंदिस्त गटर करणे २. | २५१३३२/- | | २३६/- | २५१३/- |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २. कोऱ्या निविदा फी व इसारा रक्कम ग्रामपंचायत कोथळे PDCC बँक शाखा जेजुरी खाते क्र. ०२६००२५०००००१७ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३.जि.प. रजिस्ट्रेशन, PAN कार्ड, GST certificate व या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत कोथळे यांनी राखुन ठेवला आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच**
**ग्रामपंचायत कोथळे ता. पुरंदर जि. पुणे**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषत: गांव शहर जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे व आसपासचे परिसरातील लोकांना आमचे अशिल यांनी दिलेल्या माहितीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

खाली परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही श्री. यश मनोज छाजेड, रा. नाका नं. १, आगर, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे यांचे मालकी ताबेवहिवाटीची मिळकत असून सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार हा आमचे आशिल १) श्री. राजेश केशव पारवाणी २) श्री. रितेश केशव पारवाणी, दोघेही रा. रविवार पेठ, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी नोटीस मिळकतीचे जमीन मालक श्री. यश मनोज छाजेड यांचेसोबत करण्याचे ठरविलेले आहे. तसेच सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असलेबाबत सदर मिळकतीवर कोणाचेही बक्षीस, गहाण, दान, लिज, पोटगी, चोळी-बांगडी, खरेदी, साठेखत, करार-मदार, कुळ, वहिवाट, विसार पावती, वाटप, वारस हक्क, हद्दी संदर्भात वाद, चतुः सिमांबाबत वाद अगर तक्रार, अतिक्रमण तसेच हिंदु कायद्याप्रमाणे अथवा प्रचलीत प्रथेप्रमाणे अग्रहक्काचे अधिकार, विरुध्द कब्जा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क हितसंबंध नसल्याचा त्यांनी भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे मुळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकतीत कोणाचेही हक्क, हितसंबंधीत नाहीत व असल्यास त्यांनी खात्रीने जाणीवपुर्वक सोडून दिलेली आहे असे समजून सदरचा व्यवहार पुर्ण करण्यात येईल व नंतर कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी व जिल्हा परिषद पुणे पोट तुकडी तालुका जुन्नर, पंचायत समिती जुन्नर पैकी जुन्नर नगर पालिका येथील व मे. दुय्यम निबंधक सो. जुन्नर यांचे हद्दीतील शहर जुन्नर येथील रविवार पेठ हद्दीतील मिळकत.

| अ. क्र. | सि.स.नं. | क्षेत्र चौ.मी | चतु : सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| १ | १४१६ | १०१.६ | सि.स.नं. १४१५ | गुरव आळी रस्ता | सि.स.नं. १४१७ | रविवार पेठ रस्ता |
| २ | १४१७ | १०३.४ | सि.स.नं. १४१६ | रस्ता | सि.स.नं. १४२३ व इतर | रस्ता |

याप्रमाणे भुईजागा मिळकत व त्यावरील निवासी बांधकाम केलेली मिळकत खालीलप्रमाणे,

| | |
|---|---|
| नगरपालिका मिळकत नं. - | झेडएबी ५०००७६६ (जुना मालमत्ता क्रमांक १०/ नवीन ११ |
| एकूण बांधकाम क्षेत्रफळ - | १) तळमजला - ११३.९४ चौरस मीटर व १३.६३ चौरस मीटर निवासी<br>२) पहिला मजला - ५६.३५ चौरस मीटर निवासी.<br>बांधकाम प्रचलित सिमेंट कॉंक्रीटची संरचना असलेले घर मिळकत व मोकळी जागा. |

येणे प्रमाणे मिळकत तसेच या मिळकतीमधील दगड, विट, माती इतर तदंगभूत वस्तुसह व सदर मिळकतीमध्ये जाणेयेणेकरिता रस्त्याचे वहिवाटीचे हक्कासह तसेच लाईट कनेक्शन, लाईट फिटींग, दरवाजे यासह न. पा. नळ कनेक्शन, मोकळी जागा व आंगण, संडास, बाथरुम तसेच मिळकतीबाबतचे सर्व इजमेंटरी राईटसह इतर कोणत्याही प्रकारचे हक्क व अधिकार राखुन न ठेवता असलेल्या सर्व इजमेंटरी राईटसह सदर मिळकत.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस
दि. १३/०४/२०२६

**गुलजारखान अब्दुल्लाखान पठाण**
**ॲडव्होकेट**
**बी. कॉम. एल. एल. बी.**
**ऑफीस :- राहील कॉम्प्लेक्स, ऑफीस नं. २०४, दुसरा मजला, नेहरुबाजार, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे ४१०५०२.**
**मोबा. ९९७००८००८०.**


## ४० फूट महाबोधी विहाराची भव्य प्रतिकृती



**पुणे (दै. संध्या) :**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, बोधिसत्व, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बोपोडी येथील राजर्षी शाहू चौकात भव्य आणि आकर्षक देखावा उभारण्यात आला आहे. बोपोडी परिसरात उभारण्यात आलेली महाबोधि विहार, बोधगया येथील विहाराची तब्बल ४० फूट उंच प्रतिकृती नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत आहे.

या देखाव्याचे उद्घाटन भन्ते नागघोष यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपस्थित भिक्षू संघांनी बौद्ध मंत्रोच्चार करून वातावरण भक्तिमय केले. मोठ्या संख्येने नागरिकांनी या देखाव्याला भेट देत अभिवादन केले.

ही भव्य प्रतिकृती पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर आणि माजी उपमहापौर सुनीता वाडेकर यांच्या संकल्पनेतून साकारण्यात आली आहे. आकर्षक प्रकाशयोजना, देखणी सजावट आणि सूक्ष्म कलाकुसरीमुळे या प्रतिकृतीचे सौंदर्य अधिक खुलून दिसत आहे. उद्घाटन प्रसंगी रिपाईचे शिवाजीनगर मतदारसंघ अध्यक्ष अविनाश कदम, नगरसेवक सनी निम्हण, सपना छाजेड, भक्ति गायकवाड आदि मान्यवर उपस्थित होते. आंबेडकर जयंतीनिमित्त बोपोडी परिसरात विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, या भव्य देखाव्यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, मागील अनेक दिवसांपासून महाबोधि विहार मुक्ती आंदोलन सुरू आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी ही भव्य प्रतिकृति उभारली आहे. तसेच या प्रतिकृतीला राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, महापौर मंजूषा नागपुरे भेट देणार असल्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी सांगितले.


**जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा/०४१७/प्र. क्र.२४७/मोप्र-१ दिनांक १८/१०/२०२३.**

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता,
द्वार निर्मिती विभाग अ, यांत्रिकी भवन, दुसरा मजला, दापोडी, पुणे ४११ ०१२.

ई-मेल: eegmd.punewrd@maharashtra.gov.in — दुरध्वनी क्रमांकः- (०२०)-२७१४४०३०.

**ई-निविदा सूचना क्रमांक १३ सन २०२४ २०२५**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती विभाग अ, दापोडी, पुणे-१२, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहे. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावीत, सविस्तर निविदा सूचना व ई-निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती विभाग अ, दापोडी, पुणे-१२ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | जिल्हा | निविदेची किंमत रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | वडज धरण येथील वक्रव्दारे १२X ५ मी नग, सेवाव्दारे १.५ X १.८ मी-३ नग, आपत्कालीन व्दारे १.५ X १.८ मी-१ नग, नदी व्दारे १.२ X १.८ मी- १ नग, चे देखभाल दुरूस्ती व इतर अनुषंगिक यांत्रिकी संलग्न नियमित दुरूस्ती करणे कामाबाबत. | पुणे | रु. ५८,३१,९९३/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक २१/०४/२०२६ ते दिनांक २९/०४/२०२६.
ई-निविदा उघडण्याचा दिनांक : दिनांक ०४/०५/२०२६

**महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक संकिर्ण/१२१७/प्र.क्र.११४/१७)/यांत्रिकी दिनांक ०५/०७/२०१८ आणि शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण ०५२३/(प्र.क्र.२५/२०२३)/यांत्रिकी दिनांक १४/१०/२०२४. शासन निर्णय निविदा ४१७/प्र.क्र.२४७/१७ दि. १८/१०/२०२३ अन्वये करारनाम्यात अनुक्रमे पश्चात अर्हता निकष व इतर सर्व अटी लागू राहतील.**

**खालील संकेतस्थळावर ई-निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**
http://mahatenders.gov.in. (सदर निविदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास सदर वेबसाईटवर कळविण्यात येईल.).
**निविदा सादर करणारे कंत्राटदार जलसंपदा विभागातील यात्रिकी संघटनेकडे पंजीकृत असणे आवश्यक नाही.**

जावक क्र./द्वा.नि.वि.अ/लेखा-२/निविदा/७८३/सन २०२६.
कार्यकारी अभियंता, द्वार निर्मिती विभाग अ, दापोडी, पुणे-१२, यांचे
कार्यालय दिनांक : १०/०४/२०२६

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**द्वार निर्मिती विभाग अ, दापोडी, पुणे-१२**

**विमाका/पुणे/जाहि. /११/२०१६-२७**

## थोडक्यात पण महत्वाचे...

### 'पीएमआरडीए'चा आशियाई विक्रम.. अवघ्या 95 दिवसांत उभी राहिली 14 मजली इमारत..!



पिंपरी (दैनिक संध्या) : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) गृहनिर्माण आणि अभियांत्रिकी क्षेत्रात जागतिक स्तरावर आपल्या कर्तृत्वाचा नवा झेंडा फडकावला आहे. चिखली येथील 'सेक्टर १२' गृहनिर्माण प्रकल्पात अवघ्या ९५ दिवसांत १४ मजली इमारत उभी करण्याचा भीमकाय पराक्रम 'पीएमआरडीए'ने केला आहे. या ऐतिहासिक कामगिरीची दखल घेत 'आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' आणि 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये या विक्रमाची सुवर्णाक्षरांनी नोंद करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, 'पीएमआरडीए'ने यापूर्वीचा आपलाच १०० दिवसांचा जुना विक्रम मोडीत काढत बांधकामाचा नवा मापदंड प्रस्थापित केला. सोमवारी (दि. 13) चिखली येथील प्रकल्पस्थळी आयोजित दिमाखदार सोहळ्यात 'आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'चे परीक्षक अशोक अदाक यांनी अधिकृत प्रमाणपत्र व पदक देऊन 'पीएमआरडीए'चा गौरव केला. प्राधिकरणाच्यावतीने मुख्य अभियंता रिनाज पठाण यांनी हा बहुमान स्वीकारला. 'पीएमआरडीए'चे अध्यक्ष तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली व महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त महानगर आयुक्त के. मंजुलक्ष्मी यांच्या मार्गदर्शनाखाली हा मैलाचा दगड गाठण्यात आला. हे अशक्यप्राय काम पूर्ण करण्यासाठी 'बी. जी. शिर्के कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी' या कंपनीच्या सुमारे ९ हजार कामगारांनी तीन शिफ्टमध्ये अहोरात्र काम केले. अत्याधुनिक 'प्रीकास्ट आरसीसी' तंत्रज्ञानामुळे (३-एस सिस्टिम — Safety, Strength and Speed) गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता ही इमारत विक्रमी वेळेत पूर्ण झाली. ही वास्तू पूर्णपणे भूकंपप्रतिरोधक असून शाश्वत नागरी विकासाचे उत्तम उदाहरण ठरली आहे.

### पर्यावरणपूरक इमारतींसाठी महापालिकेची सामान्य करात ग्रीन सवलत

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून पर्यावरणपूरक उपक्रमांना चालना देण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेत सामान्य करावर विविध सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. कर आकारणी आणि कर संकलन विभागाच्या या उपक्रमामुळे शहरातील नागरिकांना 'पर्यावरणपूरक' जीवनशैली अंगीकारण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे. कचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया आणि झिरो वेस्ट संकल्पना प्रभावीपणे राबवणाऱ्या इमारतींना करात थेट सवलत दिली जाणार आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संगोपन करताना नागरिकांना आर्थिक दिलासाही मिळणार आहे. महापालिकेच्या या निर्णयामुळे गृहनिर्माण संस्था आणि व्यावसायिक इमारतींना कचरा व्यवस्थापन आणि सांडपाणी पुनर्वापर करण्यास सोसायटीना प्रेरणा मिळणार आहे. पिंपरी चिंचवड महापालिका उप आयुक्त सचिन पवार म्हणाले, पर्यावरणपूरक उपाययोजना राबवणाऱ्या इमारतींना प्रोत्साहन देणे हा या सवलती मागील मुख्य उद्देश असून, नागरिकांनी ऑनसाइट कंपोस्टिंग, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एस.टी.पी) आणि झिरो वेस्ट संकल्पना स्वीकारल्यास शहरातील कचरा व्यवस्थापनास आणखी बळ मिळेल. पिंपरी चिंचवड आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले की, पिंपरी चिंचवड शहराला स्वच्छ, हरित आणि शाश्वत बनविण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे. कर सवलतींच्या माध्यमातून नागरिकांना पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा उभारण्यास प्रोत्साहन मिळेल आणि 'ग्रीन सिटी'चा संकल्प अधिक बळकट होईल. पर्यावरणपूरक सुविधा उभारणाऱ्या इमारतींना करात सवलत देण्याची ही योजना शहराला स्वच्छ, हरित आणि शाश्वत बनविण्याकडे टाकलेले महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. नागरिकांनी या सवलतींचा लाभ घेण्यासाठी आवश्यक त्या यंत्रणा उभाराव्यात आणि पर्यावरण संवर्धनात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### स्वराज्याच्या इतिहासाची छोटी वारसदार..!

पिंपरी (दैनिक संध्या) : छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणाऱ्या गडकोटांवर दुर्गभ्रमंती करत रहाटणीतील अवघ्या ८ वर्षांच्या चिमुकलीने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ज्योतिबा कॉलनी येथील कु. शर्विका म्हात्रे हिने तब्बल १७५ गडकिल्ले सर करत एक अनोखा विक्रम आपल्या नावावर नोंदवला आहे. इतक्या लहान वयात कठीण चढाई असलेले किल्ले पार करत शर्विकाने दुर्गभ्रमंतीत नवा आदर्श निर्माण केला असून तिच्या जिद्दीचे आणि साहसी वृत्तीचे सर्वत्र कौतुक होत आहे. शर्विकाच्या या यशाची दखल घेत भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या हस्ते विठ्ठलाची मूर्ती देऊन तिचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना काटे म्हणाले की, "छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले गड-किल्ले हे आपल्या स्वराज्याचे सामर्थ्य असून त्यांची ओळख पुढील पिढीपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. आजच्या मोबाईलच्या युगात मुलांनी अशा ऐतिहासिक आणि साहसी उपक्रमांकडे वळणे ही काळाची गरज आहे. शर्विकाचे हे यश इतर मुलांसाठी प्रेरणादायी आहे." या गौरव सोहळ्याला उद्योजक भरत काटे, कैलास कुंजीर, निलेश कुंजीर, शैलेश कुंजीर, शर्विकाचे कुटुंबीय तसेच ज्योतिबा कॉलनीतील नागरिक आणि मान्यवर उपस्थित होते. शर्विकाच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असून तिच्या पुढील दुर्गमोहिमांसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# नाल्यांच्या स्थितीचा डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घेतला आढावा

## संयुक्त पाहणीद्वारे बुजविलेले व अतिक्रमित नाले ओळखून आवश्यक उपाययोजना करण्याचे दिले निर्देश

**पिंपरी (दै. संध्या)**

एमआयडीसी परिसरातील नाल्यांवर झालेले अतिक्रमण आणि बुजविण्याच्या प्रकारांमुळे नैसर्गिक जलप्रवाह बाधित होत असून पावसाळ्यात पाणी साचण्याच्या घटना घडू शकतात. त्यामुळे एमआयडीसी व महापालिका अधिकारी आणि संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींसमवेत संयुक्त पाहणी करून अतिक्रमित व बुजविलेले नाले तात्काळ ओळखून आवश्यक ती कार्यवाही करावी. ज्या ठिकाणी शक्य आहे तेथे नाल्यांची मूळ रचना पुनर्स्थापित करावी किंवा पर्यायी व्यवस्था करावी, असे निर्देश आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले.



पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) परिसरातील नाल्यांची सद्यस्थिती, त्यावरील अतिक्रमणे तसेच पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पाणी साचण्याच्या समस्यांचा सखोल आढावा घेण्यासाठी पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात महत्त्वपूर्ण बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस एमआयडीसीच्या विभागीय अधिकारी अर्चना पठारे, उप आयुक्त अण्णा बोदडे, प्रदीप ठेंगल, एमआयडीसीचे कार्यकारी अभियंता संजय कोतावाड, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड, अजिंक्य येळे, अतुल पाटील, पूजा दुधनाळे, निवेदिता घार्गे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान एमआयडीसी परिसरातील जलनिस्सारण व्यवस्थेचे सध्याचे स्वरूप, अडथळे आणि त्यावरील उपाययोजना याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, शहरातील एमआयडीसी परिसरात जुन्या नकाशांमध्ये दर्शविलेले अनेक नाले कंपन्यांकडून बुजविण्यात आले आहेत किंवा त्यावर अतिक्रमण करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे. या अतिक्रमणांमुळे नैसर्गिक जलप्रवाह अडथळित होत असून, पावसाळ्यात पाणी साचणे, पूरस्थिती निर्माण होणे आणि उद्योग तसेच नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे या समस्येकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्यांना एमआयडीसी आणि संबंधित कंपन्यांच्या प्रतिनिधींसमवेत संयुक्त पाहणी करून एमआयडीसी परिसरातील बुजविलेले किंवा अतिक्रमित नाले तसेच पाणी साचणारी ठिकाणे तात्काळ ओळखून त्यांची नोंद घेण्यात यावी. शिवाय, जुन्या नाल्यांची मूळ रचना पुनर्स्थापित करण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्तीची कामे हाती घेणे गरजेचे असून, ज्या ठिकाणी ते शक्य नाही तेथे पर्यायी स्वरूपात स्टॉर्म वॉटर लाईन टाकण्याची कार्यवाही करण्यात यावी, असेही त्यांनी नमूद केले. तसेच, जलनिस्सारण मार्गांवर अतिक्रमण करणे ही गंभीर बाब असून यामुळे संपूर्ण परिसराच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. नाल्यांवर अतिक्रमण केलेल्या किंवा नाले बुजविलेल्या कंपन्यांनी अतिक्रमण काढून नाले पूर्वस्थितीत आणण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील जलनिस्सारण व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने आणि वेळेत काम करण्याचे निर्देशही आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी यावेळी दिले.

## माऊलींच्या समाधी मंदिराला आकर्षक फुलांची सजावट

**आळंदी (दै. संध्या)**

वरुथिनी एकादशीच्या निमित्ताने संतश्रेष्ठ संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या संजीवन समाधी मंदिरात आकर्षक फुलांची देखणी सजावट करण्यात आली आहे. मंदिर परिसर रंगीबेरंगी फुलांनी उजळून निघाला असून भाविकांचे विशेष आकर्षण ठरत आहे. झेंडू, अष्टर, गोंडा, राजा अशा विविध देशी-विदेशी फुलांचा वापर करून मंदिराची सजावट करण्यात आली आहे. फुलांच्या नक्षीदार रचनेमुळे मंदिराला अत्यंत मनोहारी रूप प्राप्त झाले आहे. माऊलींचा मुखवटादेखील नव्या वस्त्रांसह आणि फुलांनी सजवण्यात आला



असून तो अतिशय आकर्षक दिसत आहे. सकाळपासूनच हे सुंदर रूप पाहण्यासाठी भाविकांनी आळंदी नगरीत मोठी गर्दी केली आहे. एकूणच, वरुथिनी एकादशीच्या निमित्ताने भक्तिमय वातावरणात आळंदी नगरी न्हाऊन निघाली असून माऊलींच्या दर्शनासाठी भाविकांचा उत्साह ओसंडून वाहताना दिसत आहे.

## बालवाडीतून पहिलीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा दीक्षांत समारंभ उत्साहात

### विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर – सभापती रविना आंगोळकर

**पिंपरी (दै. संध्या)**

बालवाडी हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. या टप्प्यावर मुलांमध्ये आत्मविश्वास, सृजनशीलता आणि शिकण्याची आवड निर्माण करणे गरजेचे असते. महापालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणा सोबतच सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे, असे प्रतिपादन शिक्षण समितीच्या सभापती रविना आंगोळकर यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने पीसीएमसी पब्लिक स्कूल, साई जीवन, जाधववाडी (कन्या व मुले शाळा





क्र. ८७) येथे बालवाडीतून इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा दीक्षांत समारंभ उत्साहात पार पडला. यावेळी शिक्षण समितीच्या सभापती रविना आंगोळकर बोलत होत्या. यावेळी विधी समिती सभापती सुजाता बोराटे, नगरसदस्य राहुल जाधव यांच्यासह महापालिकेच्या प्रशासन अधिकारी संगिता बांगर, शाळेचे मुख्याध्यापक जयश्री गळीतकर, मुख्याध्यापिका मृगनयनी चव्हाण, पर्यवेक्षक प्रमिला जाधव यांच्यासह शाळेचे शिक्षक, शिक्षिका, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. सभापती रविना आंगोळकर म्हणाल्या, आजचा दीक्षांत समारंभ हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा क्षण असून, पुढील शिक्षणाच्या वाटचालीसाठी तो प्रेरणादायी ठरणार आहे. पालक, शिक्षक आणि प्रशासन यांच्या संयुक्त प्रयत्नातून विद्यार्थ्यांचा उज्ज्वल भविष्यकाळ घडविणे शक्य आहे. विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्ती जपून सातत्याने प्रगती साधावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. यावेळी विधी समिती सभापती सुजाता बोराटे, नगरसदस्य राहुल जाधव, प्रशासन अधिकारी संगिता बांगर यांनी देखील विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धमेंद्र भांगे यांनी केले.

## *भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय संबंधांवरील विचार आजही दिशा देणारे - तज्ज्ञांचे मत*

**पिंपरी (दै. संध्या)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय संबंधांवरील विचार आजही आधुनिक भारताच्या परराष्ट्र धोरणाला दिशा देणारे ठरत असून, जागतिकीकरणाच्या युगात शिक्षण व रोजगाराच्या नव्या संधी शोधताना त्यांच्या दूरदृष्टीची प्रासंगिकता अधिक ठळकपणे जाणवते. सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक समतेचा आग्रह धरणाऱ्या त्यांच्या विचारसरणीमुळे भारतीय युवकांनी जागतिक स्तरावर स्पर्धात्मक होण्यासाठी व्यापक दृष्टीकोन स्वीकारणे आवश्यक आहे, असे मत 'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय संबंधांवरील विचार आणि सद्यस्थिती तसेच परदेशातील शिक्षण व रोजगार संधी' या विषयावर आयोजित



परिसंवादात तज्ज्ञांनी व्यक्त केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित 'विचार प्रबोधन पर्व २०२६' अंतर्गत 'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय संबंधांवरील विचार आणि सद्यस्थिती तसेच परदेशातील शिक्षण व रोजगार संधी' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

या परिसंवादात परदेशातून नंदू मोरे (बेल्जियम), डॉ. शैलेश कोळेकर (डेन्मार्क), रेवा रॉय (कॅनडा), विरेंद्र घुटके (स्वीडन), धम्मचारी सुदिप्ता (इंग्लंड) यांनी दृकश्राव्य माध्यमाद्वारे सहभाग घेतला तर प्रा. डॉ. संजय खोब्रागडे (नागपूर), प्रा. केशव वाघमारे (संशोधक), प्रा. डॉ. अशोक गायकवाड (प्राचार्य, कला, वाणिज्य, बी.बी.ए. महाविद्यालय, वडगाव मावळ), प्रा. डॉ. नितीश नवसागरे (विधी महाविद्यालय, पुणे), प्रा. रोनके राम (पंजाब विद्यापीठ), प्रा. विवेक कुमार (जेएनयू, दिल्ली) हे देखील उपस्थित होते. यावेळी महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड उपस्थित होते. परदेशातील शिक्षण व रोजगाराच्या संधींबाबत मार्गदर्शन करताना नंदू मोरे यांनी जागतिक स्तरावर बदलत असलेल्या कौशल्यांच्या गरजेवर भर दिला. प्रोग्राम मॅनेजमेंट, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ॲनिमेशन, डेटा सायन्स आणि डेटा ऑटोमेशन या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. यासोबतच उत्तम संवादकौशल्य (कम्युनिकेशन स्किल्स) हे जागतिक पातळीवर यश मिळवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कॅनडामधील रोजगाराच्या संधींबाबत माहिती देताना रेवा रॉय यांनी नव्या तंत्रज्ञानाचे ज्ञान आत्मसात करण्याची गरज अधोरेखित केली. वेगाने बदलणाऱ्या जागतिक रोजगार बाजारात टिकून राहण्यासाठी सतत अद्ययावत राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कौशल्यविकास आणि तांत्रिक प्रावीण्य यांच्या आधारे भारतीय युवकांसाठी परदेशात मोठ्या संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

इंग्लंडमध्ये शिक्षण घेताना आलेल्या अनुभवांचे कथन करताना धम्मचारी सुदिप्ता यांनी परदेशातील शैक्षणिक प्रवासातील आव्हाने मांडली. वंचित समाजाच्या प्रश्नांना जागतिक स्तरावर मांडण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमुळे अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले. तसेच परदेशातही बाबासाहेबांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते, असे त्यांनी नमूद केले.

युरोपियन देशांमध्ये शिक्षण घेतल्यानंतर येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाययोजनांबाबत विरेंद्र घुटके यांनी मार्गदर्शन केले. प्रत्येक देशातील रोजगाराच्या संधी समजून घेताना स्थानिक भाषा शिकणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शिक्षणादरम्यान इंटर्नशिप करण्याचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून कौशल्य विकासाला चालना मिळते, असे स्पष्ट केले.

# आजच्या पिढीने बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आचरणात आणणे गरजचे

**महापौर रवि लांडगे यांचे प्रतिपादन**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन**

**पिंपरी (दै. संध्या)**

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समता, स्वातंत्र्य आणि न्यायाचा विचार हा आपल्या संविधानाचा पाया आहे. त्यांनी दिलेल्या शिक्षण, संघटन आणि संघर्षाच्या मंत्रामुळे समाजात परिवर्तन घडले. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांना केवळ स्मरणात न ठेवता आचरणात आणणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.





पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील त्यांच्या प्रतिमेस, भीमसृष्टी तसेच एच. ए कॉलनी आणि दापोडी येथील पुतळ्यास महापौर रवि लांडगे तसेच महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. विविध ठिकाणच्या या अभिवादन प्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शहर सुधारणा समिती सभापती संजय काटे, माजी महापौर योगेश बहल,नगरसदस्य बाबासाहेब त्रिभुवन,कुशाग्र कदम, डॉ. सुहास कांबळे, मंदार देशपांडे, नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, माई काटे, वर्षा जगताप, यांच्यासह अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सहशहर अभियंता अजय सुर्यवंशी, उपआयुक्त अण्णा बोदडे, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरूषांच्या कार्याचा जागर करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ११ ते १७ एप्रिल या कालावधीत 'सामाजिक समता सप्ताह' आणि 'विचार प्रबोधन पर्व' आयोजित करण्यात आले आहे. या पर्वाच्या माध्यमातून महापुरूषांच्या विचारांचा प्रसार करून समाजात जागर निर्माण करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. या उपक्रमांमध्ये शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन समता, बंधुता आणि सामाजिक जबाबदारी यांचा संदेश अधिक व्यापक करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन देखील महापौर रवि लांडगे यांनी यावेळी केले.

पिंपरी येथील भीमसृष्टी परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यावर एकता कर्मचारी संघटनेच्या वतीने हेलिकॉप्टरच्या माध्यमातून भव्य पुष्पवृष्टी करण्यात येत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अनोखी मानवंदना देण्यात आली. आकाशातून होत असलेल्या या पुष्पवृष्टीमुळे परिसरात उत्साहपूर्ण आणि भारावलेले वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित नागरिकांनी या अनोख्या उपक्रमाचा मोठ्या उत्साहात साक्षीदार होत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याला अभिवादन केले.

यावेळी महापौर रवि लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसदस्य बाबासाहेब त्रिभुवन तसेच अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी, उपआयुक्त अण्णा बोदडे यांनी हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करून अभिवादन केले. एकता कर्मचारी संघटनेच्या वतीने दरवर्षी हा उपक्रम राबविण्यात येत असून यंदाही मोठ्या उत्साहात ही मानवंदना साजरी करण्यात आली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### नायगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

पुरंदर (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्याच्या पुर्व भागातील नायगाव येथील ग्रामपंचायत मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला. दिप प्रज्वलन करण्यात आले.यावेळी नायगाव सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर,सामाजिक कार्यकर्ते अल्लाउद्दीन सय्यद,संतोष गायकवाड,सुलोचना खंकाळ यांनी आपली मनोगते व्यक्त केली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची माहिती देण्यात आली. यावेळी उपसरपंच निलोफर सय्यद, संजय होले, अर्जुन पाटोळे, किशोर खळदकर, राहुल कड, मंगेश चौंडकर, रविंद्र ठवाळ, संतोष जाधव, आनंद पाटोळे,राजू पाटोळे, सुशील चौंडकर, राहुल पाटोळे, आदिनाथ भागवत आदी उपस्थित होते. आभार ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब कड यांनी मानले.



### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती संपन्न

दौंड (दैनिक संध्या) : दौंड तालुका कानगांव ग्रमपचायत व विकास सोसायटी येथे भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयती मंगळवार दिनांक 14 एप्रिल रोजी सकाळी 11 वाजता अयोजित करण्यात आली यावेळी रामदास पवार यानी बाबासाहेब आंबेडकर याच्या जिवनावर माहिती दिली चेरमन भास्कर फडके, सरपंच राहुल चाबुकस्वर यानी अपले मनोगत वेक्त केले यावेळी अप्पासाहेब कोर्हाळे, भिमा पाटस संचालक राजेंद्र गवळी, राहुल कुल मित्र मंडळ अध्यक्ष अकुश गवळी, सामाजिक कार्यकरते माऊली शेळके, पिटू चौधरी, बाळासाहेब सरडे, मा. चेरमन धनंजय कोर्हाळेए, दत्ता फडके, भाऊसाहेब कोर्हाळे व इत्तर मान्यवर उपस्थित होते.

### गुळुंचवाडी येथील विहिरींनी गाठला तळ



नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील गुळुंचवाडी येथील विठ्ठलदरा पाझर तलाव आणि गणेश पाझर तलाव हे पूर्णपणे कोरडे पडले असून परिसरातील विहिरींनी तळ गाठला आहे. त्यामुळे शेतकरी वर्गापुढे मोठे संकट उभे राहिले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावर्षी एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापर्यंत तलावात काही प्रमाणात पाणी होते, मात्र आता विठ्ठलदारा पाझर तलाव आणि गणेश पाझर तलाव हे दोन्ही कोरडे झाल्याने शेतीसाठी पाणी मिळणे कठीण झाले आहे. हे दोन्ही तलाव आटल्यामुळे परिसरातील विहिरींनी तळ गाठायला सुरुवात केली आहे त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या पिकांच्या उत्पादनावर होत असून शेतीला जोडधंदा म्हणून शेतकरी करत असलेल्या दुग्ध व्यवसायाला देखील या पाणीटंचाईचा मोठा फटका बसत आहे. तसेच हिरवा चाराही उपलब्ध होत नसल्याने जनावरांच्या खाद्याचा प्रश्न निर्माण झाला असून दुधाच्या उत्पादनात घट होत असल्याचे शेतकरी सांगत आहेत. तसेच पाणीटंचाईचा हा प्रश्न केवळ पाळीव प्राण्यांपुरता मर्यादित नसून या आटलेल्या दोन्ही तलावामुळे वनविभागाच्या क्षेत्रातील वन्य प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर झाला आहे. त्यामुळे गुळुंचवाडी परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांच्या नजरा या पावसाकडे लागल्या असून, जनावरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याच्या प्रश्नसोडवण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

### विक्रांत पतसंस्थेने काढला चार कोटींचा विमा

नारायणगाव (दैनिक संध्या) : सालाबादप्रमाणे यावर्षी चालू असलेल्या मुक्ताई व काळोबा देवस्थान यात्रोत्सवानिमित्त विक्रांत नागरी सहकारी पतसंस्थेने चार कोटींचा विमा काढला आहे. येत्या २४ एप्रिल रोजी विक्रांत नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. संतोषदादा जयवंतराव वाजगे यांचा वाढदिवस दरवर्षीप्रमाणे वेगवेगळ्या समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा होणार आहे. उत्तर पुणे जिल्ह्यातील सर्वात मोठा असलेला आई मुक्ताई व काळोबा देवस्थान यात्रौत्सव सुरू होत असताना गेल्या अनेक वर्षांपासून विक्रांत नागरी सहकारी पतसंस्था, नारायणगावकडून यात्रेकरू, स्वयंसेवक, प्रशासनातील सर्व अधिकारी, कर्मचारी या सर्वांना विमाकवच प्राप्त करून देण्यात येत आहे त्यासाठी या संपूर्ण श्री. मुक्ताई व काळोबा देवस्थान यात्रौत्सवानिमीत्त संरक्षण म्हणून चार कोटी रुपयांचा विमा काढलेला आहे. संपूर्ण यात्रा, भाविक भक्त आणि परिसराचा असा उपक्रम करणारी पुणे जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पहिलीच यात्रा असेल. नारायणगावमधील सर्वधर्मीयांचा हा यात्रौत्सव एक सुरक्षित यात्रौत्सव म्हणून मानांकनास प्राप्त होणार आहे आपण या यात्रौत्सवात सहभागी व्हावे, आनंद घ्यावा ही विनंती. मुक्ताई व काळोबा देवस्थान यात्रौत्सव मंडळाने केली आहे.

### नावाला कामाचे भूमिपूजन करून नागरिकांची दिशाभूल



चाकण (दैनिक संध्या) : रस्त्याच्या कॉंकटीकरण कामाचे निव्वळ नावाला भूमिपूजन करून नागरिकांची दिशाभूल केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. प्रशासन व ठेकेदार यांच्यातील दिरंगाईमुळे रस्त्याचे भूमिपूजन होऊन महिना उलटला तरीही रस्त्याच्या कॉंक्रिटीकरण कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली नसल्याने नागरिकांनी प्रचंड नाराजी व्यक्त केली आहे. चिखल तुडवत जाताना नागरिकांची होणारी बेजारी लक्षात घेऊन चाकण - राक्षेवाडी रस्त्यावरील मनशक्ती केंद्र ते चाकण महाविद्यालयापर्यंतच्या रस्त्याच्या काँक्रेटीकरन कामाचे गेल्या महिन्यात मोठ्या थाटात भूमिपूजन झाले. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले होते. उशिरा का होईना या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन झाल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला होता. चाकण मधून पुढे राक्षेवाडी कडे जाताना रस्त्याच्या दुरावस्थेमुळे नागरिक हैराण झाले होते. रस्त्यात खड्डा की खड्डयात रस्ता हे समजत नव्हते. पावसाळ्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व चाकणकर नागरिकांना अक्षरशः चिखल तुडवत पुढचा प्रवास करावा लागत होता. चाकण नगरपरिषदेच्या माध्यमातून नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्रमांक तीन मधील या रस्त्याच्या कामाला प्रत्यक्षात कधी सुरुवात होईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा सुवर्णा राक्षे यांनी सांगितले की," प्रशासन व ठेकेदार यांनी कामात चालढकल न करता नागरिकांच्या भावनांची कदर करून पावसाळ्यापूर्वी चाकण - राक्षेवाडी या रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाचे काम मार्गी लावण्याची गरज आहे.

# जेजुरीत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

**जेजुरी (दै. संध्या)**



महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीत जेजुरी नगरपरिषद, पुणे जिल्हा आरपिआय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंच यांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीत जेजुरी नगरपरिषद, पुणे जिल्हा आर पी आय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंच, व अनुयायी यांच्या वतीने क्रांतीसुर्य जोतिबा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई, नगरसेवक अस्लम पानसरे, रोहित खोमणे, योगेश जगताप, गणेश डोंबे, नगरसेविका स्नेहल भालेराव, मेघा उबाळे, प्रज्ञा राऊत, भक्ती कोरपड, मोनिका घाडगे, नीलम सातभाई, मुख्याधिकारी चारुदत्त इंगुले,जेजुरी देवसंस्थानचे अध्यक्ष अड विश्वास पानसे, विश्वस्त मंगेश घोणे, जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दीपक वाकचौरे आदींनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी खंडोबा पालखी सोहळा ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे, माजी विश्वस्त शिवराज झगडे, भाजपाचे शहर अध्यक्ष सचिन पेशवे, जिल्हा युवा मोर्चा महिला आघाडीच्या अध्यक्षा अलका शिंदे, जेजुरी शिवसेना अध्यक्ष विठ्ठल सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते संतोष खोमणे, रमेश बयास, पोलीस उपनिरीक्षक सर्जेराव पुजारी, नामदेव तारडे व मोठ्या संख्येनं डॉ. आंबेडकर अनुयायी उपस्थित होते.

व्याख्याते लेखक डॉ. नारायण टाक यांनी आपल्या व्याख्यानात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी व संविधान विषयी विचार व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जेजुरी आनंद नगर येथे पिंपरणी च्या झाडाखाली सभा झाली होती या ठिकाणी वृक्षाचे संवर्धन करून स्मारक उभारावे अशी मागणी माजी विश्वस्त शिवराज झगडे यांनी केली. तर जेजुरी गडावर शासनाच्या वतीने सुरू असलेल्या तीर्थक्षेत्र विकास आरखड्याच्या कामात जेजुरी गडाच्या पायथ्याशी असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे सुशोभीकरण करावे अशी मागणी केली. आनंद नगर व गडाच्या पायथ्याशी असणाऱ्या स्मारकाच्या विकासासाठी दोन लक्ष रुपयांची देवसंस्थानच्या माध्यमातून विकास कामे करण्यात येतील असे यावेळी विश्वस्त मंगेश घोणे यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे नियोजन आर पी आय चे पंढरीनाथ जाधव व गौतम भालेराव व कार्यकर्त्यांनी केले.

## हवेली तालुक्यात जमिनीच्या वादातून शेतकऱ्यावर जीवघेणा हल्ला

**उरुळी कांचन (दै. संध्या)**

जमिनीच्या वादातून शेतकऱ्यावर धारदार शस्त्रांनी जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना वळती गावात घडली असून,याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात परस्पर विरोधात फिर्याद देण्याने ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या घटनेत फिर्यादी अरविंद मच्छींद्र कुंजीर (वय ५०,रा.वळती,ता.हवेली) हे १२ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास आपल्या शेतातील गट नं.३२८ मध्ये मिरचीच्या रोपांना पाणी देत होते.यावेळी पूर्वी तोडलेल्या बांधावरील झाडांच्या कारणावरून वाद निर्माण झाला. या वादातून आरोपी संभाजी एकनाथ कुंजीर (वय ४२),शैला संभाजी कुंजीर (वय ३६,दोघे रा.वळती,ता. हवेली) तसेच दिनेश शांताराम म्हस्के (वय ३४) व उमेश शांताराम म्हस्के (वय ३५,दोघे रा.डाळींब,ता.दौंड) यांनी संगनमत करून फिर्यादीवर कोयता,गज,स्क्रूड्रायव्हर व विळ्याने हल्ला केला. या हल्ल्यात फिर्यादीच्या नाकावर, छातीवर, हातावर व कंबरेवर गंभीर दुखापत झाली.

## भीम समता वृक्ष लावून भीम जयंती उत्साहात साजरी

**जेजुरी (दै. संध्या)**



जेजुरी येथील छत्रपती शिवाजी महाराज विद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त "भीम समता वृक्ष" लागवड करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये समता, सामाजिक बांधिलकी आणि निसर्ग संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आली.

या वेळी जेजुरी नगरपरिषदेच्या नगरसेविका स्नेहल भालेराव यांच्या हस्ते "भीम समता वृक्ष" लावण्यात आला. कार्यक्रमात विद्यालयाचे प्राचार्य श्रीकांत पवार यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनचरित्राचा उहापोह करत विविध पैलू विद्यार्थ्यांसमोर मांडले. कार्यक्रमाचे आयोजन शिक्षिका हेमांगी कोळेकर, धनश्री जाधव, अश्विनी शिंदे, वर्षा रणवरे, कोमल भोसले व प्रतीक्षा खलाटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समन्वयिका प्रियंका पवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राचार्य श्रीकांत पवार यांनी मानले.

## मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर संघटनांच्यावतीने अभिवादन

**जेजुरी (दै. संध्या)**



पुरंदर तालुका मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर संघटनांच्या वतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, बोधिसत्व, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी विविध शिक्षक व शिक्षकेतर संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव तसेच राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श प्राचार्य नंदकुमार सागर,बारामती पंचायत समितीच्या विस्तारधिकारी निलिमा मेमाणे,राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त सेवानिवृत्त मुख्याध्यापक कुंडलिक मेमाणे, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक संघाचे प्रवक्ते वसंतराव ताकवले, पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष रामप्रभू पेटकर, पुणे जिल्हा शिक्षकेतर संघाचे उपाध्यक्ष अशोक बाने, पुणे जिल्हा टीडीएफचे कोषाध्यक्ष प्रशांत बेंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच पुरंदर तालुका माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष दत्तात्रय रोकडे, पुरंदर तालुका शिक्षक परिषदेचे अध्यक्ष शिवहार लहाने,सचिव दिपक भोसले,मुळशी तालुका शिक्षक परिषदेचे अध्यक्ष अरुण खेडकर, पुरंदर तालुका शिक्षकेतर संघाचे अध्यक्ष सिद्राम कांबळे, माजी अध्यक्ष पांडुरंग जाधव, कार्याध्यक्ष संदिप चाचर, कार्यकारिणी सदस्य राम भोसले, मोहन निगडे, दत्तात्रय शिर्के तसेच संघटक धुळदेव पवार,उपशिक्षक गणेश पावरा, जितेंद्र राठोड आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी नंदकुमार सागर यांनी आपल्या सविस्तर मनोगतात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा आणि विचारांचा परामर्श घेतला. त्यांनी सांगितले की, शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन असून डॉ. आंबेडकरांनी दिलेला समता, बंधुता व न्यायाचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन, संविधानिक मूल्ये आणि सामाजिक बांधिलकी रुजविण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तसेच उपस्थित मान्यवरांनीही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विचारांचा गौरव करत त्यांच्या कार्याची उजळणी केली.

समाजातील समता, बंधुता व न्याय या मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रम उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात

## भागडेश्वर डोंगराला भीषण आग

**निरगुडसर (दै. संध्या)**

आंबेगाव तालुक्यातील गांजवेवाडी येथील भागडेश्वर डोंगराला सोमवार(ता.१३)रोजी दुपारी भीषण आग लागली. या आगीत सुमारे १५० ते २०० एकर वनक्षेत्र जळून खाक झाले असून, डोंगरावरील अफाट जैवविविधतेचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे.कडक उन्हाळा आणि सोसाट्याचा वारा यामुळे आगीने रौद्र रूप धारण केल्याने वनविभागाची मोठी तारांबळ उडाली. मिळालेल्या माहितीनुसार,आज सोमवार (ता.१३) रोजी दुपारच्या सुमारास भागडेश्वर डोंगराच्या एका भागातून आगीचे लोळ उठू लागले.उन्हाचा तडाखा जास्त असल्याने काही वेळातच ही आग संपूर्ण डोंगरावर पसरली.या आगीत डोंगरावरील दुर्मिळ वनौषधी,लहान-मोठे जिवजंतू,पशू-पक्षी आणि त्यांची घरटी होरपळून भस्मसात झाली आहेत.पर्यावरणाचे हे मोठे नुकसान पाहून निसर्गप्रेमींकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. आगीची बातमी समजताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.डोंगराळ आणि दुर्गम भाग असल्याने आग विझवताना अनेक अडचणी येत होत्या मात्र वन कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांनी जीवाची पर्वा न करता शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळवले. स्थानिक तरुणांनी आणि ग्रामस्थांनी वेळीच मदत केल्याने पुढील मोठा अनर्थ टळला.

तालुक्यातील वाढत्या वणव्यांच्या घटना रोखण्यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलावीत आणि नागरिकांनीही डोंगराळ भागात आग लावू नये,असे आवाहन निसर्गप्रेमींकडून करण्यात येत आहे.

## शिवे येथे अरुण साळुंके यांचा सेवापुर्ती निमित्त विशेष गौरव




**चाकण(दै. संध्या)**

श्री रामगीर बाबा शिक्षण संस्थेच्या शिवे येथील ज्ञानदीप विद्यालयात तब्बल ३२ वर्ष सहशिक्षक म्हणून कार्यरत असणारे अरुण सुदाम साळुंके यांचा सेवापूर्ती निमित्त ग्रामस्थांच्या वतीने विशेष गौरव करण्यात आला. अरुण साळुंके हे आपल्या सेवाभावी वृत्तीमुळे अध्यापनाबरोबर विविध सामाजिक उपक्रमात कार्यरत होते. रामगीरबाबा शिक्षण संस्था व ज्ञानदीप विद्यालय शिवे यांनी अरुण साळुंके यांचा सपत्नीक सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ देवून आदर्श गुरु म्हणून सन्मान केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक लक्ष्मण सुरजी हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार भगवानराव साळुंखे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे पुणे विभाग सेवा प्रमुख सुरेशराव कोबल, खेड तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष संजय बोरकर, खेड तालुका पंचायत समितीचे माजी उपसभापती चांगदेव शिवेकर, पंचायत समितीचे माजी सदस्य रोहिदास गडदे, रामगीरबाबा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सचिन शिवेकर, उपाध्यक्ष विनायक शिवेकर, सचिव नंदकुमार शिवेकर, शिवे गावच्या सरपंच निर्मला कोळेकर, तुकाराम शिवेकर, निलेश काशिद आदींसह शालेय विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अरुण साळुंके यांनी यावेळी त्यांच्या आईची ग्रंथतुला करून तब्बल चारशे पुस्तकांचे वाटप केले. बाल साहित्याचा १६५ पुस्तकांचा एक संच असे एकूण पाच संच पंचक्रोशीतील शाळांना भेट स्वरूपात दिले. गुणवंत विद्यार्थ्यांसाठी साळुंके यांनी एकावन्न हजार रुपयांची देणगी त्यांची आई अनुसया सुदाम साळुंके यांच्या हस्ते संस्थेचे अध्यक्ष सचिन शिवेकर, उपाध्यक्ष विनायक शिवेकर, सचिव नंदकुमार शिवेकर यांच्याकडे सुपूर्त केली. माजी विद्यार्थ्यांनी जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ५३ बाटल्यांचे रक्त संकलन करण्यात आले.

# सरसेनापती हंबीरराव मोहिते लॉ कॉलेजमध्ये मूट कोर्ट स्पर्धा संपन्न

**नारायणगाव (दै. संध्या)**




सरसेनापती हंबीरराव मोहिते लॉ कॉलेजमध्ये मूट कोर्ट स्पर्धेचे भव्य व यशस्वी आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विविध नामांकित विधी महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या कायदेविषयक ज्ञानाचे उत्कृष्ट सादरीकरण केले.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. आमदार दिलीपराव मोहिते पाटील, उपाध्यक्ष सीए बबनराव डांगले सर, सरचिटणीस डॉ. शिवाजीराव मोहिते, खजिनदार सौ.सुरेखाताई मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य डॉ. किरण शिंदे यांच्या नेतृत्वाखाली स्पर्धेचे सुयोग्य नियोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रा. काळे, प्रा. तायडे, प्रा. सोनारीकर, प्रा. मून, प्रा. वाडेकर, प्रा.वैद्य, प्रा.घोलप, प्रा. बोरकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच शिक्षकेतर कर्मचारी शेवाळे सर, घेवडे मॅडम, सांडभोर सर, राक्षे मॅडम, शिंदे मावशी, बोंबले मावशी यांचेही सहकार्य लाभले.

या स्पर्धेची सुरुवात प्राथमिक ऑनलाईन फेरीने झाली असून त्यानंतर उपांत्य व अंतिम फेरी प्रत्यक्ष पद्धतीने पार पडली. उपांत्य फेरीत बालाजी स्कूल ऑफ लॉ विरुद्ध श्री. ओंकारनाथ मालपाणी लॉ कॉलेज तसेच मराठवाडा मित्र मंडळ शंकरराव चव्हाण लॉ कॉलेज विरुद्ध यशवंतराव चव्हाण लॉ कॉलेज, पर्वती यांच्यात सामने रंगले. या फेरीसाठी गोपाळ शिंदे सर, अक्षय बर्वे सर, हसनैन काझी सर व विजय दिघे सर यांनी न्यायाधीश म्हणून काम पाहिले. तर अंतिम फेरीत बालाजी स्कूल ऑफ लॉ आणि मराठवाडा मित्र मंडळ शंकरराव चव्हाण लॉ कॉलेज यांच्यात उत्कंठावर्धक सामना झाला. या फेरीचा न्यायनिवाडा हसनैन काझी सर, गोपाल शिंदे सर व विजय दिघे सर यांनी केला.

या स्पर्धेत मराठवाडा मित्र मंडळ शंकरराव चव्हाण लॉ कॉलेज यांनी प्रथम क्रमांक पटकावला, तर बालाजी स्कूल ऑफ लॉ यांनी उपविजेतेपद मिळवले. विशेष पारितोषिकांत बेस्ट मेमोरियल हा पुरस्कार ओंकारनाथ मालपाणी लॉ कॉलेज यांना प्रदान करण्यात आला. बेस्ट रिसर्चर म्हणून यशवंतराव चव्हाण लॉ कॉलेज, पर्वती यांची निवड झाली, तर बेस्ट स्पीकर हा पुरस्कार रेहाना इक्बाल इमानी बालाजी स्कूल ऑफ लॉ यांना प्रदान करण्यात आला. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी दिव्या जोशी, नंदिनी उपाडे, वैष्णवी गांडेकर, प्राजक्ता राऊत, ज्ञानेश्वरी अहिनवे, रेणुका खंडागळे, अक्षदा टेमगिरे, मिताली देखणे, शिल्पा मावळे, अश्विनी मुळूक, निकिता मटाले, शिवानी होटकर, कल्याणी मोरे, आदित्य चिखले, जुनेद शेख, अभिजीत राक्षे, ओम बागलाने, संकेत लांडगे, सतीश शिंदे, अतुल कालेकर, गणेश कड, विकास गवते, ऋषिकेश कायंदे, कौशल ताथवडे व मुकेश चौधरी यांचा समावेश आहे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रिया सुधाकर येलमटे व उर्मिला डाकोरे यांनी केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना न्यायालयीन कार्यपद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला असून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### वनप्लस इंडिया सर्व्हिस नेटवर्क आता 600+ ओप्पो इंडिया सर्व्हिस सेंटर्समध्ये उपलब्ध

मुंबई (दैनिक संध्या) : वनप्लस इंडियाने आज जाहीर केले की त्यांचे विस्तारित आफ्टर-सेल्स सर्व्हिस नेटवर्क आता देशभरात सुरू झाले आहे. यामुळे ग्राहकांना भारतातील 600+ ओप्पो इंडिया सर्व्हिस सेंटर्समध्ये सपोर्ट मिळू शकतो. या उपक्रमामुळे सेवा उपलब्धता अधिक सुलभ झाली असून, विशेषतः मेट्रो शहरांबाहेरील ग्राहकांनाही जवळच्या सर्व्हिस सेंटरमध्ये मदत मिळणार आहे. मागील घोषणेवर आधारित, या रोलआउटमुळे आफ्टर-सेल्स सर्व्हिस अधिक सुलभ झाली आहे. ग्राहकांना आता विस्तारित सर्व्हिस नेटवर्कद्वारे सोयीस्करपणे सपोर्ट मिळू शकतो. वनप्लसचे सर्व्हिस स्टँडर्ड्स कायम राहतील – यात जलद प्रतिसाद देण्याचे वचन, ओरिजिनल स्पेअर पार्ट्सचा वापर आणि प्रशिक्षित तंत्रज्ञांकडून मिळणारी मदत यांचा समावेश आहे. ही घोषणा वनप्लस सर्व्हिस देशभरात मोठ्या प्रमाणावर अधिक सुलभ करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. आता ग्राहकांना भारतभरातील अधिकृत सर्व्हिस सेंटर्समध्ये भेट देऊन सपोर्ट मिळू शकतो.



### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाचा प्रचार व प्रसार करु या

मुंबई (दैनिक संध्या) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाचा प्रचार व प्रसार करु या, असे आवाहन संविधान प्रचारक कार्यकर्त्या स्नेहल कांबळे यांनी केले. विक्रोळी कन्नमवार नगर येथील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी स्नेहल कांबळे बोलत होत्या. मंडळाचे सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार महाराष्ट्र शासन सन्मानित ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास मंडळाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक कृष्णा काजरोळकर, माजी अध्यक्ष विनायक पेवेकर, सल्लागार वासुदेव कदम, चित्रोळीकार मुकुंद कुलकर्णी, सी. के. सर्वगोड,बबन देशनेहरे आदि मान्यवर उपस्थित होते. स्नेहल कांबळे यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. माता रमाई शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर अपूर्ण होते. स्वतःची चार मुले दगावली असताना रमाईने डॉ. बाबासाहेब आंबेडकर परदेशात असताना स्वतः हाल अपेष्टा सहन करीत त्यांच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही, ते ज्ञानाचे महासागर, बहुआयामी व्यक्तिमत्व होते. त्यांनी समाजाला प्रवाहात आणले आहे. त्यांनी दिलेल्या समानतेसाठी प्रयत्न केले पाहिजेत. डॉ. बाबासाहेबांकडे ११ भाषा व ३२ पदव्या होत्या. त्यांनी दिलेले संविधान जगात श्रेष्ठ आहे, असे सांगताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भिमजयंती २०० देशात साजरी होते असे स्नेहल कांबळे यांनी अधोरेखित केले. जगात महिलांना मतदानासाठी झगडावे लागले. परंतु आपल्या देशात डॉ. बाबासाहेबांनी महिलांना मतदानाचा अधिकार संविधानात दिला आहे, याकडे कांबळे यांनी लक्ष वेधले. पुणे स्टेशन जवळील साडे तीन एकरात माता रमाईचे स्मारक आहे. त्याठिकाणी आपण ज्येष्ठ नागरिकांनी भेट द्यावी, असे स्नेहल कांबळे विनम्र पणे म्हणाल्या. प्रारंभी प्रभात मित्र मंडळाच्या गायकांनी प्रभात समयी भिम गीते गाऊन वातावरण प्रफुल्लित केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे उपाध्यक्ष निवृत्ती मस्के, उपसचिव श्रध्दानंद निकम, भूमय्या सोमा, विलास देशनेहरे, हरिश्चंद्र गावकर, बबन माने, पोपट साठे आदिंनी परिश्रम घेतले.

### जीई एरोस्पेसने भारतीय हवाई दलासोबत करारावर केली स्वाक्षरी

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : जीई एरोस्पेसने आज भारतीय हवाई दलासोबत (आयएएफ) करार जाहीर केला आहे. या करारांतर्गत, हवाई दलाच्या तेजस या हलक्या लढाऊ विमान (एलसीए) ताफ्याला शक्ती देणाऱ्या F404 -IN20 इंजिनांसाठी भारतात डेपो सुविधा स्थापन केली जाणार आहे. ही सुविधा भारतीय हवाई दलाद्वारे उभारली जाईल, ज्यासाठी जीई एरोस्पेस तांत्रिक मदत पुरवणार आहे. यामुळे भारताच्या स्वदेशी संरक्षण देखभाल प्रयत्नांना मोठी मदत मिळण्याची अपेक्षा आहे. ही सुविधा कार्यान्वित झाली की, दुरुस्तीसाठी परदेशातील केंद्रांवर अवलंबून राहण्याची गरज उरणार नाही, ज्यामुळे दुरुस्तीचा लागणारा वेळ लक्षणीयरित्या कमी होईल. या डेपो सुविधेची मालकी, संचालन आणि देखभाल भारतीय हवाई दलाकडे असेल, तर जीई एरोस्पेस तांत्रिक माहिती, प्रशिक्षण, सहाय्यक कर्मचारी आणि आवश्यक सुटे भाग व विशेष उपकरणांचा पुरवठा करेल. हा सहयोग जीई एरोस्पेस आणि भारतीय हवाई दल यांच्यातील चार दशकांपासून असलेल्या भागीदारीतील पुढचे महत्त्वाचे पाऊल आहे. "भारतीय सशस्त्र दलांना पाठबळ देण्याची आमची कटिबद्धता तेजस ताफ्याची स्थानिक देखभाल क्षमता वाढवण्यासाठी आमच्यातील सहकार्य आणि भागीदारीला मार्गदर्शन करत राहील," असे जीई एरोस्पेसच्या डिफेन्स अँड सिस्टम्स विभागाच्या सेल्स व बिझनेस डेव्हलपमेंटच्या उपाध्यक्ष रिटा फ्लॅहर्टी म्हणाल्या. "या आगामी डेपो सुविधेच्या माध्यमातून आम्ही भारतीय हवाई दलासाठी F404-IN20 इंजिनांची उपलब्धता सुनिश्चित करू, ज्यामुळे त्यांच्या संरक्षण गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञान सहज उपलब्ध होईल, याची खात्री मिळेल.

### शिबिरात साडेतीन हजाराहून अधिक लाभार्थ्यांना मिळाला लाभ



पुणे (दैनिक संध्या) : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत लोणीकंद येथे पार पडलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात एकूण ३ हजार ८८५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला असल्याची माहिती लोणी काळभोरच्या अपर तहसीलदार तृप्ती कोलते-पाटील यांनी दिली. यामध्ये महसूल विभागाच्यावतीने २ हजार १५०, पंचायत समितीअंतर्गत ६३७, पशुसंवर्धन विभाग ४०, आरोग्य विभाग १३४, कृषी विभाग ३८२, महावितरण १८२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ ३, भूमी अभिलेख २ आणि पुरवठा विभागाअंतर्गत ३६० याप्रमाणे एकूण ३ हजार ८८५ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरामध्ये नागरिकांच्या महसूल विषयक विविध समस्यांचे तात्काळ निराकरण करून, ७/१२ उतारे, फेरफार, ७/१२ दुरुस्ती, विविध दाखले तसेच विविध विभागाच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जातात, या शिबारात अधिकाधिक नागरिकांनी सहभागी होवून लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमती कोलते-पाटील यांनी केले आहे.

# बाबासाहेब यांचे विचार अंमलात आणणे आवश्यक : माधुरी मिसाळ

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५वी जयंतीनिमित्त सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न

पुणे (दै. संध्या)



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मंत्र केवळ घोषणांपुरता मर्यादित न ठेवता, तो प्रत्यक्ष सामाजिक प्रगतीसाठी अंमलात आणणे आवश्यक आहे. आजच्या काळात केवळ स्मारके किंवा फ्लेक्स लावण्यापेक्षा समाजातील तरुण पिढीला, विशेषतः विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आणि उद्योगासाठी प्रत्यक्ष मदत करणे हीच महामानवाला खरी आदरांजली ठरेल, असे प्रतिपादन राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी केले. क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंतीनिमित्त सामाजिक न्याय भवन, विश्रांतवाडी येथे प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती आणि सहायक आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित कार्यक्रम तसेच सामाजिक समता सप्ताहाच्या समारोपप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी आमदार बापुसाहेब पठारे, राज्याच्या समाज कल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे, विभागाच्या सहआयुक्त (शिक्षण) प्रमोद जाधव, प्रादेशिक उपआयुक्त वंदना कोचुरे, सहायक आयुक्त विशाल लोंढे आदी उपस्थित होते. श्री.पठारे यांनी महामानवांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा संदेश दिला. श्रीमती मुधोळ-मुंडे म्हणाल्या, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या जयंतीचे औचित्य साधून सामाजिक समता सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या पुढे म्हणाल्या, महामानवांचे कार्य, त्यांचे विचार, आपल्याकडून अपेक्षित असलेले वर्तवणूक तसेच समाज कल्याण विभागामार्फत विविध योजनांची माहिती दिली. श्री. जाधव यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शेतक-यांसाठी केलेले कार्य" या विषयावर व्याख्यान दिले.

श्रीमती कोचुरे यांनी समाज कल्याण कार्यालयाच्या अंतर्गत असणाऱ्या वसतिगृह, निवासी शाळांमध्ये 8 ते 14 एप्रिल 2024 या कालावधीमध्ये सामाजिक समता सप्ताहानिमित्त घेण्यात आलेल्या विविध कार्यक्रमाबाबत माहिती दिली.

श्री. लोंढे यांनी उपस्थित विद्यार्थी व नागरीकांना शुभेच्छा संदेश देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी विचार घेवून जीवनाची वाटचाल यशस्वी करावी, असे आवाहन केले. यावेळी समाज कल्याण विभागातील विविध अधिकारी व कर्मचारी यांच्यासह शासकीय वसतिगृहातील गृहप्रमुख व गृहपाल तसेच विद्यार्थी- विद्यार्थीनी, नागरिक उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते अ‍ॅट्रॉसिटी अंतर्गत प्रकरणातील मयत व्यक्तींच्या 19 वारसांना शासकीय नोकरी प्रदान करण्याबाबतचे आदेश, तसेच स्टँड अप इंडिया, स्वाधार व शिष्यवृत्ती योजनांच्या लाभार्थ्यांचा सन्मान प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमापूर्वी सामजिक न्याय मंत्री माधुरी मिसाळ यांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी पुणे शहराच्या महापौर मंजुषा नागपुरे, उपआयुक्त (नियोजन) विजयकुमार गायकवाड, प्रादेशिक उपआयुक्त वंदना कोचुरे, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त रविंद्र कदम पाटील, सहायक आयुक्त विशाल लोंढे, श्री मारकड आदी उपस्थित होते.

## इंद्रिया ज्वेलरीचा विस्तार; फिनिक्स मार्केटसिटीमध्ये चौथे स्टोअर

पुणे (दै. संध्या)



आदित्य बिर्ला ज्वेलरीचा प्रीमियम ब्रँड 'इंद्रिया'ने पुण्यातील विमाननगर येथील फिनिक्स मार्केटसिटीमध्ये आपले नवीन स्टोअर सुरू केले आहे. शहरातील हे ब्रँडचे चौथे स्टोअर असून, यामुळे महाराष्ट्रातील इंद्रियाची उपस्थिती अधिक मजबूत झाली आहे.

पूर्व पुण्यातील प्रमुख रिटेल आणि लाइफस्टाइल हब असलेल्या फिनिक्स मार्केटसिटीमध्ये उभारण्यात आलेले हे स्टोअर आधुनिक लक्झरी आणि ग्राहक-केंद्रित अनुभव देण्यावर भर देणारे आहे. सुजाण आणि शहरी ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन स्टोअरचे डिझाइन करण्यात आले असून, खरेदीचा मंत्रमुग्ध करणारा अनुभव देण्यासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. या स्टोअरमध्ये ३२,००० हून अधिक दागिन्यांचे डिझाइन्स उपलब्ध आहेत. यात वधू-अलंकार, सण-उत्सवांसाठीचे दागिने, समकालीन डिझाइन्स तसेच दैनंदिन वापरासाठी हलक्या वजनाचे दागिने यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, येथे 'कारीगरी रूम'चीही सुविधा देण्यात आली असून ग्राहकांना दागिन्यांची कलाकुसर प्रत्यक्ष अनुभवता येते आणि डिझाइन प्रक्रियेत सहभाग घेण्याची संधी मिळते. इंद्रियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) संदीप कोहली यांनी यावेळी सांगितले, "पुणे ही आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची बाजारपेठ आहे. येथील ग्राहकांच्या बदलत्या आवडीनिवडी आणि डिझाइन-आधारित दागिन्यांची वाढती मागणी लक्षात घेऊन आम्ही हा विस्तार केला आहे. चौथ्या स्टोअरच्या माध्यमातून अधिकाधिक ग्राहकांना उच्च दर्जाचा खरेदी अनुभव देण्याचा आमचा प्रयत्न आहे."

या नव्या स्टोअरच्या माध्यमातून इंद्रिया ब्रँडने पश्चिम भारतातील आपली पकड अधिक मजबूत केली असून, प्रीमियम ज्वेलरी रिटेल क्षेत्रातील आपली उपस्थितीही वाढवली आहे. समकालीन डिझाइन्स आणि ग्राहकाभिमुख सेवेमुळे इंद्रिया ब्रँड पुण्यातील वाढत्या आणि गतिमान बाजारपेठेत आपले स्थान अधिक भक्कम करत आहे.




## विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांचे डॉ. बाबासाहेबांना अभिवादन

पुणे (दै. संध्या)

विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपविभागीय अधिकारी विठ्ठल जोशी, तहसीलदार स्मिता माने, सहायक आयुक्त विशाल लोंढे आदी उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त जितेंद्र डुडी यांचे अभिवादन




पुणे (दै. संध्या)

जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आणि पुणे महानगरपालिका आयुक्त नवल राम किशोर यांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपविभागीय अधिकारी विठ्ठल जोशी, तहसीलदार स्मिता माने आदी उपस्थित होते.

## एथर एनर्जीतर्फे देशभरात ७०० एक्सपीरियन्स सेंटर्स विस्ताराची घोषणा

पुणे (दै. संध्या)




भारतातील आघाडीच्या विद्युत दुचाकी उत्पादकांपैकी एक असलेल्या एथर एनर्जी लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये देशभरातील आपले विक्री जाळे दुप्पट करत ७०० एक्सपीरियन्स सेंटर्सचा महत्त्वपूर्ण टप्पा गाठल्याची घोषणा केली आहे. मागील वर्षभरात कंपनीने ३५० हून अधिक नवीन केंद्रे सुरू केली असून, ३१ मार्च २०२५ रोजी असलेल्या ३५१ केंद्रांच्या तुलनेत ही लक्षणीय वाढ आहे. या विस्तारामुळे ग्राहकांपर्यंत पोहोच वाढून विद्यमान तसेच नव्या बाजारपेठांमध्ये कंपनीला वेगाने विस्तार साधता आला आहे. वाहन नोंदणीच्या आकडेवारीनुसार, मार्च २०२६ मध्ये एथरचा राष्ट्रीय बाजारहिस्सा १८.७ टक्क्यांपर्यंत पोहोचला असून, ही वाढ प्रामुख्याने कंपनीच्या पहिल्या कुटुंबीय वापरासाठीच्या 'एथर रिट्झा' या स्कूटरच्या यशामुळे झाली आहे; सादरीकरणापासून या स्कूटरच्या २.८ लाखांहून अधिक युनिट्सची विक्री झाली आहे, तर 'एथर ४५०'कार्यक्षमतेवर आधारित मालिकेलाही सातत्याने मागणी मिळत आहे. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये कंपनीने मध्य भारत तसेच देशातील इतर प्रदेशांमध्ये धोरणात्मक विस्तारावर विशेष भर दिल्यामुळे या भागांमध्ये बाजारहिस्स्यात जवळपास दुप्पट वाढ नोंदविण्यात आली आहे, तसेच दक्षिण भारतातील उपस्थिती अधिक मजबूत करत दुसऱ्या आणि तिसऱ्या स्तरातील शहरांमध्येही विस्तार साधण्यात आला आहे. या यशाबद्दल बोलताना एथर एनर्जीचे मुख्य व्यवसाय अधिकारी रवनीत सिंह फोकेला म्हणाले की, विक्री जाळ्याच्या विस्तारामुळे नव्या भौगोलिक क्षेत्रांमध्ये आणि ग्राहक गटांमध्ये पोहोच वाढून विक्री व बाजारहिस्स्यात भक्कम वाढ झाली असून, आगामी तिमाहींमध्येही ही वाढ कायम ठेवण्याचा कंपनीचा मानस आहे. विक्री जाळ्याबरोबरच ग्राहकांना अखंड मालकीचा अनुभव देण्यासाठी एथरने देशभरात ५०० अधिकृत सेवा केंद्रांचा टप्पा गाठला आहे, तसेच 'एथर ग्रिड' या देशातील सर्वात मोठ्या दुचाकी जलद-चार्जिंग जाळ्याचा विस्तार ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ४,३५७ चार्जिंग बिंदूपर्यंत करण्यात आला आहे, ज्यामुळे वाहनचालकांना अधिक सोयीस्कर आणि सुलभ चार्जिंग सुविधा उपलब्ध झाली आहे.

# विक्रम सोलरने १० गिगावॅटचा टप्पा गाठत यशाची केली नोंद

मुंबई (दै. संध्या)

- आता भारतातील 50 लाखांहून अधिक घरांना ऊर्जा पुरवठा करत भारताच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणामध्ये आपली वाढती भूमिका अधिक दृढ केली आहे.
- अवघ्या दोन वर्षांत क्षमता 5 गिगावॅटवरून दुपटीने वाढवून 10 गिगावॅटवर नेली आहे.
- 39 देशांमध्ये 1.5 गिगावॅटची निर्यात करून जागतिक स्तरावरील आपली उपस्थिती अधिक दृढ केली आहे.

विक्रम सोलर या भारतातील आघाडीच्या सोलर पीव्ही मॉड्यूल उत्पादक कंपनीने जगभरात एकूण 10 गिगावॅट सौर मॉड्यूल क्षमतेचा टप्पा ओलांडला आहे. कंपनीच्या प्रगतीमधील हे महत्त्वाचे संपादन आहे, ज्यासह कंपनीने जागतिक स्वच्छ ऊर्जा संक्रमणामध्ये आपली भूमिका अधिक प्रबळ केली आहे.

या यशाचे महत्त्व सांगायचे झाले तर, विक्रम सोलरने जगभरात बसवलेले 10 गिगावॅट क्षमतेचे सौर मॉड्यूल्स हे 25 दशलक्षहून अधिक मॉड्यूल्स इतके आहेत. ही क्षमता भारतातील 5 दशलक्षहून अधिक घरांना वीज पुरवण्यासाठी पुरेशी आहे. विशेष म्हणजे, कंपनीने आपली एकूण क्षमता 5 गिगावॅटवरून अवघ्या दोन वर्षांमध्ये दुपटीने वाढवून 10 गिगावॅटपर्यंत वाढवली आहे. यामधून गेल्या दोन दशकांपासून निर्माण केलेली विश्वासार्हता आणि सौर ऊर्जेची वेगाने वाढणारी मागणी दिसून येते. भारतातील सौर क्षेत्राने गेल्या काही वर्षांत उल्लेखनीय प्रगती केली आहे, विक्रमी वेगाने वाढत आता 150 गिगावॅट क्षमतेचा टप्पा यशस्वीपणे ओलांडला आहे. या परिवर्तनामध्ये विक्रम सोलरने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. जवळपास दोन दशकांचे उत्पादन कौशल्य आणि अंमलबजावणीतील अनुभवाच्या जोरावर कंपनीने मोठ्या प्रमाणावर उच्च-कार्यक्षम सौर उपाय उपलब्ध करून दिले आहेत. यातील बहुतांश प्रकल्प भारतात असले तरी, विक्रम सोलरने जागतिक स्तरावरही आपली उपस्थिती सातत्याने वाढवली आहे. जवळपास 1.5 गिगावॅटच्या निर्यातीसह कंपनीने 39 देशांमध्ये आपली उपस्थिती निर्माण केली आहे. हे यश कंपनीला जागतिक उत्पादकांच्या निवडक गटामध्ये स्थान मिळवून देते, ज्यांचा विस्तार भारताबाहेर देखील मोठ्या प्रमाणात आहे. तसेच, या यशामधून स्वच्छ ऊर्जा संक्रमणाला आकार देण्यात कंपनीची वाढती भूमिका दिसून येते. विक्रम सोलरच्या नाविन्यपूर्ण वारशामुळे आणि या क्षेत्रातील नेतृत्वामुळे हा टप्पा अधिक महत्त्वपूर्ण ठरला आहे. कोचीनमध्ये जगातील पहिले पूर्णतः सौर उर्जेवर चालणारे विमानतळ उभारण्यापासून भारतातील सुरुवातीच्या फ्लोटिंग सोलर प्रकल्पांपर्यंत ही कंपनी तंत्रज्ञान स्वीकारण्यात नेहमी अग्रस्थानी राहिली आहे. ब्लूमबर्ग एनईएफच्या टियर 1 यादीत मिळालेले स्थान, सलग अनेक वर्षे किवा पीव्हीईएल (KIWA PVEL) मॉड्यूल रिलायबिलिटी स्कोरकार्डमध्ये मिळालेली मान्यता आणि इकोव्हॅडिसचे प्लॅटिनम रेटिंग या सर्वांमधून कंपनीची गुणवत्ता, विश्वासार्हता आणि शाश्वततेप्रती कटिबद्धता दिसून येते. हाफ-कट सेल्स सारखे नेक्स्ट-जनेरशन मॉड्यूल तंत्रज्ञान भारतात सादर करणाऱ्या सुरुवातीच्या कंपन्यांमध्ये विक्रम सोलरचा समावेश आहे, ज्यामधून त्यांच्या कार्यक्षमता आणि गुणवत्तेवर असलेले लक्ष दिसून येते.

विक्रम सोलरने पश्चिम बंगाल आणि तामिळनाडूमध्ये मिळून 9.5 गिगावॅट क्षमतेची मॉड्यूल निर्मिती केंद्रे उभारली आहेत. यामध्ये तामिळनाडूतील वल्लम येथील 5 गिगावॅटचा प्रकल्प त्याच्या प्रगत ऑटोमेशन आणि अत्याधुनिक उत्पादन यंत्रणांसाठी ओळखला जातो. आपल्या बॅकवर्ड इंटिग्रेशन धोरणाचा भाग म्हणून, गंगाकोंडन येथील प्रकल्पाचा विस्तार करून त्याची क्षमता 6 गिगावॅट मॉड्यूल आणि 12 गिगावॅट सेल निर्मितीपर्यंत नेण्यात येणार आहे. कंपनी व्हीएसएल पॉवरहाईव्हच्या माध्यमातून ऊर्जा साठवणूक क्षेत्रातही विस्तार करत आहे. आर्थिक वर्ष 2027 पर्यंत 5 गिगावॅट-तास (जीडब्ल्यूएच) क्षमतेचा बीईएसएस प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. तसेच, निवासी आणि मोबिलिटी बॅकअप सोल्यूशन्ससाठी कंपनीचा वीयॉन (VION) हा लिथियम बॅटरी ब्रँड कार्यरत आहे. विक्रम सोलरचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्री. ज्ञानेश चौधरी म्हणाले, "10 गिगावॅट क्षमतेचा टप्पा ओलांडणे हा विक्रम सोलरसाठी अभिमानाचा क्षण आहे, तसेच या टप्प्यामधून सौर ऊर्जा जागतिक ऊर्जा क्षेत्राला वेगाने मिळत असलेला आकार दिसून येतो. आमच्या प्रगतीच्या पुढील अध्यायात प्रवेश करताना उच्च-कार्यक्षम तंत्रज्ञानाचा विकास, उत्पादन क्षमता मजबूत करणे आणि बॅकवर्ड इंटिग्रेशन सखोल करणे यांवर आमचा भर कायम राहील. यामुळे आम्हाला जागतिक ऊर्जा संक्रमणासाठी आवश्यक असणारे मोठे प्रमाण, स्थिरता आणि विश्वासार्हता यामध्ये अर्थपूर्ण योगदान देता येईल."

विक्रम सोलर लिमिटेड भारतातील आघाडीची सोलर मॉड्यूल उत्पादक कंपनी आहे. कंपनी कार्यक्षम फोटोव्होल्टेइक (पीव्ही) मॉड्यूल निर्मितीमध्ये विशेषीकृत आहे. कंपनी जगभरातील 39 देशांमध्ये उपस्थित आहे. पश्चिम बंगालमधील कोलकाता येथे मुख्यालय असलेली कंपनी भारतातील सर्वात मोठ्या पीव्ही मॉड्यूल उत्पादकांपैकी एक आहे, ज्यांची एकूण उत्पादन क्षमता 9.5 गिगावॅट इतकी आहे. पीव्हीईएलच्या पीव्ही मॉड्यूल रिलायबिलिटी स्कोरकार्डमध्ये विक्रम सोलरला टॉप परफॉर्मर म्हणून गौरवण्यात आले आहे. तसेच, सलग 8 तिमाहींपासून ब्लूमबर्ग एनईएफच्या टियर 1 सोलर पीव्ही मॉड्यूल उत्पादकांच्या यादीत या कंपनीचा समावेश आहे. 105 हून अधिक अधिकृत वितरक, 435 पेक्षा जास्त डीलर्स आणि 77 हून अधिक सिस्टिम इंटिग्रेटर्सच्या विस्तृत नेटवर्कद्वारे विक्रम सोलरने संपूर्ण भारतात आपले मजबूत स्थान निर्माण केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### एम.डी. ड्रग्स विक्री करणाऱ्या दोघांना पोलिसांनी मुद्देमालासह केली अटक

पुणे (दैनिक संध्या) : दिनांक ०८/०४/२०२६ रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास विमानतळ पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना विमानतळ पोलिस ठाण्याचे तपास पथकातील पोलीस शिपाई हरी पुंडे, पोलीस शिपाई लालू कऱ्हे यांना त्यांच्या गुप्त बातमी दारामार्फत एक बातमी मिळाली की जनक बाबा दर्गा चौकाजवळ एक इसम एम. डी. ड्रग्स विक्रीकरिता येणार आहे, त्या अनुषंगाने सदरची बातमी गुन्हे शाखेच्या पोलिस निरीक्षक शरद शेळके यांना कळविले असता त्यांनी शहानिशा करून कारवाई करण्याबाबत आदेश दिले त्याप्रमाणे तपास पथकातील पोलीस स्टाफ सह सापळा रचून प्रीतम प्रफुल कुलकर्णी वय ३७ वर्षे राहणार साईनाथ नगर वडगाव शेरी पुणे यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून ३.५९ ग्रॅम एम . डी. पावडर व एक मोटरसायकल जप्त केली. नमूद आरोपीकडे पोलीस कोठडी तपासामध्ये पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपास केले असता माहिती मिळाली उबेद अन्सार खान राहणार हडपसर हा खुळेवाडी परिसरामध्ये ड्रग्स विक्री करण्यासाठी आला असताना ताब्यात घेऊन त्याच्याकडून ०४ ग्रॅम एम. डी . पावडर व एक स्कॉर्पिओ कार जप्त करण्यात आली असून एकूण २६,७१८००/_ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. दाखल गुन्ह्याचा पुढील तपास विमानतळ पोलिस स्टेशनचे उपनिरीक्षक नितीन राठोड करीत आहेत . सदरची कारवाई पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पोलीस सहायुक्त रंजनकुमार शर्मा, अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त परिमंडळ ०७ सोमय मुंडे, साहेब पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्या आदेशान्वये पोलीस निरीक्षक गुन्हे शरद शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक नितीन राठोड, पोलीस कर्मचारी लालू कऱ्हे, हरिदास पुंडे, आकाश जोगदंडे, योगेश थोपटे, रुपेश पिसाळ, सचिन मांजरे, राहुल जोशी, प्रशांत सुतार, सागर कासार, अंबादास चव्हाण यांच्या पथकाने ही कामगिरी केली.



### विमाननगर शाळेत सुसज्ज व आधुनिक स्वच्छतागृह सुविधा

पुणे (दैनिक संध्या) : शालेय स्तरावर स्वच्छता आणि आरोग्याचा प्रश्न सोडवण्यासाठी या व्हि कन्स्ट्रक्ट प्रा. ली पुणे स्थित बांधकाम अभियांत्रिकी व तंत्रज्ञान कंपनीने आपल्या सी एस आर उपक्रमांतर्गत "दि क्लीन प्रॉमिस" या मोहिमेच्या माध्यमातून विमाननगर येथील संत गोरोबा बाल-विद्या निकेतन शाळेत अत्याधुनिक स्वच्छतागृह सुविधा उभारून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. अनेक शाळांमध्ये अद्यापही स्वच्छ व सुरक्षित स्वच्छतागृहांचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांना आरोग्याच्या समस्या, गैरहजेरी, तसेच अस्वस्थतेला सामोरे जावे लागते. विशेषतः मुलींसाठी ही समस्या अधिक गंभीर ठरते. या पार्श्वभूमीवर व्हि कन्स्ट्रक्ट ने पुढाकार घेत विद्यार्थ्यांसाठी स्वच्छ, सुरक्षित आणि सन्मानजनक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या नव्या सुविधेमध्ये आधुनिक स्वच्छतागृह, मुलींसाठी स्वतंत्र चेंजिंग रूम, तसेच दिव्यांगांसाठी अनुकूल व्यवस्था करण्यात आली असून उच्च दर्जाच्या साहित्याचा वापर करून टिकाऊपणा आणि स्वच्छता यावर विशेष भर देण्यात आला आहे. यावेळी बोलताना मनोज देशमुख, संचालक, व्हि कन्स्ट्रक्ट यांनी सांगितले की, "' दि क्लीन प्रॉमिस' हा केवळ एक प्रकल्प नसून विद्यार्थ्यांच्या आरोग्य, सन्मान आणि उज्ज्वल भविष्यासाठी दिलेला आमचा शब्द आहे. स्वच्छ वातावरणातूनच चांगले शिक्षण आणि आत्मविश्वास निर्माण होतो." या उपक्रमाचा लाभ १००० हून अधिक विद्यार्थ्यांना होणार असून त्यामुळे आरोग्य सुधारणा, गैरहजेरीत घट आणि शिक्षणासाठी अधिक अनुकूल वातावरण निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. सी एस आर च्या माध्यमातून व्हि कन्स्ट्रक्ट समाजाप्रती आपली बांधिलकी जपत असून हा उपक्रम स्वच्छता, आरोग्य आणि शैक्षणिक विकास यांचा प्रभावी संगम ठरत आहे.



### भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रशासनाच्यावतीने अभिवादन

बारामती (दैनिक संध्या) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. उप विभागीय अधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात तहसीलदार स्वप्नील रावडे यांच्या सह कर्मचारी उपस्थित होते.



### शिवे येथील रक्तदान शिबिरात 53 बाटल्यांचे संकलन

चाकण (दैनिक संध्या) : विद्यार्थी घडविण्यात मोलाचे योगदान देणाऱ्या अरुण साळुंके या शिक्षकांच्या सेवानिवृत्ती निमित्त खेड तालुक्यातील शिवे येथे चक्क माजी विद्यार्थ्यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन करून समाजापुढे वेगळा आदर्श निर्माण केला आहे. रामगीरबाबा शिक्षण संस्थेच्या शिवे येथील ज्ञानदीप विद्यालयातील गुणवंत शिक्षक अरुण सुदाम साळुंके हे ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त होणार असल्याने माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या सेवापूर्ती निमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. रक्ताचा तुटवडा भासू नये म्हणून येथील जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित या रक्तदान शिबिरात ५३ जणांनी रक्तदान केले. खेड पंचायत समितीचे माजी सदस्य रोहिदास गडदे व रामगीर बाबा शिक्षण संस्थेचे संचालक शिवाजी शिवेकर यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी माजी सरपंच सुनील बारवेकर, शिवाजी साळुंके व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. रक्तदान शिबिराचे आयोजन व संयोजन श्रीकांत गडदे, अक्षय शिवेकर, सागर गडदे, गणेश गडदे, प्रविण करपे, रोशन साळुंके आदींनी केले होते.

# सासवडमध्ये भीमजयंतीचा जल्लोष

## विचारांच्या जागरणाने महामानवास अभिवादन



## पुर्णाकृती पुतळा आणि सुसज्ज सभागृह उभारणार : माजी आमदार संजय जगताप

प्रबोधन सभेत बोलताना माजी आमदार संजय जगताप यांनी सासवडकरांसाठी महत्त्वाची घोषणा केली. "सासवड येथील या परिसरात लवकरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना साजेसे एक सुसज्ज सभागृह उभारले जाईल. तसेच, याठिकाणी बाबासाहेबांचा भव्य पुर्णाकृती पुतळा बसवण्यासाठी विशेष प्रयत्न करून ही वास्तू लवकरच पूर्ण केली जाईल," असे आश्वासन त्यांनी आपल्या भाषणात दिले.

सासवड (दै. संध्या)

महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती सासवड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात अत्यंत उत्साही आणि भारावलेल्या वातावरणात साजरी करण्यात आली. पुरंदर तालुका बहुजन महापुरुष संयुक्त जयंती महोत्सव समितीच्या वतीने आयोजित या सोहळ्यात दिवसभर विविध प्रबोधनात्मक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली.

सकाळच्या सत्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्यास विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर धम्मविधी, ध्वजारोहण आणि धार्मिक विधी पार पडले.

या जयंती उत्सवाचे खास आकर्षण म्हणजे गुरुकुल अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली नाटिका. यामध्ये मुलांनी जिजामाता, अहिल्याबाई होळकर, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, भारतमाता, स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, रमाबाई आंबेडकर आणि उमाजी नाईक यांच्या वेशभूषा साकारून उपस्थितांची मने जिंकली. ऐश्वर्या भुजबळ यांनी या नाटिकेचे नेटके सूत्रसंचालन केले. दुपारी सादर झालेल्या 'जल्लोष भीम गीतांचा' या सांगीतिक कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांनी भरभरून दाद दिली. तसेच शिवगर्जना, साहसी प्रात्यक्षिके आणि व्याख्यानांमधून विचारांचा जागर करण्यात आला.

समितीचे अध्यक्ष ॲड. सुनील धिवार यांच्या अध्यक्षतेखाली प्रबोधन सभा पार पडली. यावेळी मुख्य वक्ते प्रबुद्ध साठे यांनी बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. याप्रसंगी आनंदराव घोरपडे, सी. एम. यादव, शैलेश धिवार, विजय कांबळे, अविनाश जगताप, आबासाहेब वाघमारे आणि भाऊसौ सोनवणे यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

या सोहळ्याला माजी जिल्हा परिषद अध्यक्ष विजय कोलते, जालिंदर कामठे, साहित्य परिषद अध्यक्ष ॲड. दिलीप निरगुडे, पोलीस निरीक्षक कुमार कदम, जिल्हा परिषद सदस्य हरिभाऊ लोळे, नगरसेवक बंडू राऊत, माऊली गिरमे, बाळासाहेब भिंताडे, शिवसेना तालुका प्रमुख अभिजित जगताप, दत्ता कड, डॉ. संजय रावळ, डॉ. सुरेश कोडीतकर, सीमा साळवे, सुनीता कोलते, शोभा जमदाडे, संजीवनी गायकवाड, संदीप फडतरे, रवी फुले, धनंजय साबळे, शैलेश धिवार, मोहन चव्हाण, प्रा. उषा टिळेकर, डॉ. एन. डी. धिवार, प्रणाली जमदाडे, अर्चना कुंभार, जयश्री शिंदे, राजाराम बेंगळे, केशव काकडे यांसह सासवडकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विष्णुदादा भोसले यांनी केले, तर सूत्रसंचालन कैलास धिवार यांनी केले. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी सुनील धिवार, सोपान रणपिसे, राहुल गायकवाड, कैलास धिवार, बळीराम सोनवणे, सुहास बेंगाळे, विनायक गायकवाड आणि सुनील जगताप यांनी विशेष परिश्रम घेतले.

# २१ कोटींच्या निधीतून तीन पूल; चिपळूण-संगमेश्वरच्या विकासाला गती

## आमदार शेखर निकम यांच्या पाठपुराव्याला यश

चिपळूण (दै. संध्या)

चिपळूण - संगमेश्वर मतदार संघातील महत्त्वाच्या दळणवळणाच्या प्रश्नांना दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला असून, केंद्रिय मार्ग निधी (CRF) अंतर्गत तीन पुलांच्या बांधकामासाठी एकूण २१ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. हा निधी आमदार शेखर निकम यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे मिळाल्याचे स्पष्ट होत आहे. संगमेश्वर तालुक्यातील कासार कोळवण येथील रा.मा. १६६ वांझोळे–कासार कोळवण–बोंड्ये ते रा.मा. १७४ या मार्गावरील बावनदीवरील मोठा पूल अतिवृष्टीत वाहून गेल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या पुलाच्या बांधकामासाठी ६.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे या भागातील दळणवळण सुरळीत होण्यास मोठी मदत होणार आहे.



त्याचप्रमाणे संगमेश्वर तालुक्यातील कारभाटले येथील प्र.जि.मा. ४६ ते हेदली-अणदेरी-कारभाटले प्र.जि.मा. ४७ या मार्गावर कि.मी. ०/९०० येथे शास्त्री नदीवर ७२ मीटर लांबीच्या पुलाच्या बांधकामासाठी ६.५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या पुलामुळे परिसरातील गावांमधील अंतर कमी होऊन नागरिकांची पायपीट मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली ही मागणी आता पूर्णत्वास जाणार आहे. तसेच चिपळूण तालुक्यातील दळवटणे येथील खांदाट–दळवटणे–मोरवणे मार्गावरील प्र.जि.मा. २७ कि.मी. १/०० येथील मोठ्या पुलाच्या पुनर्बांधणीसाठी ८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामामुळे स्थानिकांसाठी सुरक्षित आणि अखंड वाहतूक व्यवस्था उपलब्ध होणार आहे.

# महामानवाची जयंती समाजासाठी प्रेरणादायक : डॉ. हुलगेश चलवादी

## 'विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अधिकार अभियाना'चे ब्रिगेडियर (नि) सुमित रे यांच्या हस्ते उद्घाटन

पुणे (दै. संध्या)



असंख्य कष्ट सोसून अवघ्या देशातील पीडित, वंचित, उपेक्षितांना समता-बंधुता-न्याय मिळवून देत सामाजिक क्रांती घडवणारे विश्वरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर हे युगप्रर्वतक ठरले. बोधिसत्व बाबासाहेबांची जयंती समाजासाठी प्रेरणादायक तसेच संघर्षाची आठवण करून देणारी ठरते. आंबेडकरी विचारांचा वारसा पुढे सुरु ठेवण्याची जवाबदारी आपली तसेच येणाऱ्या पिढीची आहे, याची जाणीव जयंती करून देते; अश्या शब्दात चलवादी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी 'भीमजयंती' निमित्त डॉ.बाबासाहेबांना अभिवादन केले.

विद्यानगर येथील पुणे इंटरनॅशनल स्कूल ॲंड ज्युनिअर कॉलेज येथे आयोजित "विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर अधिकार अभियानाचे' उद्घाटन ब्रिगेडियर (नि) सुमित रे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी डॉ.चलवादी बोलत होते. कार्यक्रमात ॲड. रेणुका चलवादी, सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल शिर्के, प्राचार्य स्मिता लोंढे, व्यवस्थापिका सायली शिंदे, उप-प्राचार्य जयश्री कदम, बीना कदम, ज्योती सचदेव, अश्विनी मोहिते, सर्व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होता. अभियान उद्घाटनापूर्वी विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांच्या प्रतिमेस प्रमुख उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून बुद्ध वंदना व संविधानाच्या प्रास्ताविकाचे सामूहिक वाचन करण्यात आले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अधिकार अभियानामध्ये शिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार, आरोग्य, कायदा विषयक सल्ला व सर्व प्रकारच्या शासकीय योजनेची माहिती देण्यात येणार आहे. संबंधित प्रमाणपत्र मिळण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येणार असून सर्व लाभार्थ्यांपर्यंत ही योजना पोहचवून त्यांचे फॉर्म भरून घेत संबंधित प्रत्येक नागरिकाला त्याचा मोफत लाभ करून देणार येईल, असे डॉ.चलवादी यांनी स्पष्ट केले. मुख्य अतिथी ब्रिगेडियर सुमित रे यांनी या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, "अशा प्रकारच्या जनहितार्थ कार्यक्रमांची आज समाजाला मोठी गरज आहे. डॉ. चलवादी आणि त्यांचे सहकारी घरोघरी जाऊन नागरिकांना लाभ मिळवून देण्यासाठी जे कष्ट घेत आहेत, ते स्तुत्य असून हे अभियान नक्कीच यशस्वी होईल' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष जाधव व आभार प्राचार्य स्मिता लोंढे यांनी मानले.या अभियानामुळे विद्यानगर परिसरातील गरजू नागरिकांना मोठा आधार मिळणार आहे.

# कौतुकास्पद : पोलिसांकडून २३ लाखांचा मुद्देमाल केला जप्त

पुणे (दै. संध्या)



लक्ष्मीनगर पोलिस स्टेशन अंतर्गत बेकायदेशीर विदेशी वाहतूक करणाऱ्या स्कॉर्पिओ वाहनासह पोलिसांना जवळपास तेवीस लाख तीस हजार नऊशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात लक्ष्मीनगर पोलिसांना यश येऊन पोलिसांनी केलेल्या भरारी कारवाईच्या भूमिकेमुळे त्यांच्यावर कौतुकाची थाप पडत आहे.

याप्रकरणी अग्रेजसिंग पुरणसिंग गिल (वय ३८ वर्षे, रा. रामनगर, बोपखेल) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून दोन लाख रुपयांच्या विदेशी दारुसह स्कॉर्पिओ वाहन क्रमांक(एमएच_१४_। p_ ७४७४) हे स्कॉर्पिओ वाहनासह जवळपास तेवीस लाख तीस हजार नऊशे पंच्याहत्तर रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात लक्ष्मीनगर पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दोन दिवसापूर्वी बातमीदाराच्या माहितीनुसार येरवडा भागातील दर्ग्याजवळून एका काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओ वाहनातून बेकायदेशीरपणे विदेशी दारू घेऊन जात असल्याची माहिती रात्रपाळीस गस्तीवर असलेले लक्ष्मीनगर पोलिस स्टेशनचे सहायक पोलिस निरीक्षक मिथुन सावंत व पोलिस कर्मचारी भीमराव कांबळे यांना समजताच याची माहिती त्यांनी लक्ष्मीनगर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र कदम यांना देताच पोलिस स्टेशनचे गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक उमेश गित्ते, सहायक पोलिस निरीक्षक मिथुन सावंत, रविकांत नंदनवार, पोलिस कर्मचारी भीमराव कांबळे,अमोल वायाळ,दत्तात्रय शिंदे,सूरज ओंबासे,अमोल गायकवाड,कादिर शेख,राहुल परदेशी,अतुल जाधव या पोलिस तपास पथकाने पुणे शहर पोलिस आयुक्त अमितेश कुमार,रंजनकुमार शर्मा,पूर्व विभागाचे अप्पर पोलिस आयुक्त मनोज पाटील,येरवडा विभागाचे सहायक पोलिस आयुक्त सुनील जैतापूरकर,लक्ष्मीनगर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली केली.गेल्या चार महिन्यापासून लक्ष्मीनगर पोलिस स्टेशनचे वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पोलिस पथकाकडून विविध प्रकारची भरारी कामगिरी होत असल्याने वरिष्ठ अधिकाऱ्याकडून त्यांच्यावर कौतुकाची थाप पडत आहे.

# माजी उपसरपंच राजश्री काळभोर यांचे आमरण उपोषण सुरू

लोणी काळभोर (दै. संध्या)




ग्रामपंचायत कदमवाकवस्ती हद्दीत दिनांक १४/०९/२०२५ रोजी अतिवृष्टी होऊन येथील नागरीकांच्या घरात पाणी शिरले. काहींचा तर संसार उघडयावर पडला तसेच त्यांच्या जीवनावश्यक वस्तुचे नुकसान झाले. आजपर्यंत अतिवृष्टीतील बाधितांना नुकसान भरपाई न मिळाल्याने कदमवाकवस्तीच्या माजी उपसरपंच राजश्री काळभोर यांनी १३ एप्रिल पासून ग्रामस्थांसह आमरण उपोषण सुरू केले आहे. अप्पर तहसील कार्यालय लोणी काळभोर समोर हे उपोषण सुरू असुन त्याला ग्रामस्थांनी मोठा पाठिंबा दिला आहे. राजश्री काळभोर यांच्या बरोबर ग्रामस्थ पण उपोषणाला बसल्यामुळे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष या उपोषणाकडे लागते आहे. याबाबत काळभोर यांनी सांगितले की अतिवृष्टीमुळे नागरिकांच्या घरांत पाणी शिरून मोठे नुकसान झाले होते. ग्रामपंचायतीने पंचनामे करून ते महसूल विभागाकडे सोपवले होते. मात्र जाहीर झालेल्या यादीत अनेक बाधितांची नावे वगळण्यात आली असून काही पंचनामे वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवण्यातच आले नाहीत, असा आरोप काळभोर यांनी केला आहे. पंचनामे वेळेत सादर न करणाऱ्या संबंधित ग्राम महसूल अधिकारी व मंडल अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी आणि बाधितांना तत्काळ भरपाई द्यावी .अशी मागणी काळभोर यांनी केली आहे.

# जुन्नरमध्ये 'एसएफआय'च्या ३० व्या पुणे जिल्हा अधिवेशनाची समता रॅलीने उत्साहात सुरुवात



जुन्नर (दै. संध्या)

शाळा वाचवा, शिक्षण वाचवा' आणि 'सर्वांना शिक्षण, सर्वांना काम' हा नारा देत स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) पुणे जिल्हा समितीच्या ३० व्या जिल्हा अधिवेशनाला आज जुन्नर शहरात मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. अधिवेशनाच्या प्रारंभी जुन्नर शहरातून भव्य 'समता रॅली' काढण्यात आली, ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. जुन्नर येथील श्री तुळजाभवानी सभागृह येथे या अधिवेशनाचे उद्घाटन सत्र पार पडले. या अधिवेशनाचे उद्घाटन अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या (AIDWA) राष्ट्रीय नेत्या कॉ.मरियम ढवळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सध्याचे सरकार उद्योगपतींच्या हिताचा निर्णय घेत असून सर्वसामान्य जनतेला देशोधडीला लावली आहे. देशातील विद्यार्थी आणि युवक समस्येच्या गर्तेत अडकला आहे. अशातच शिक्षणाचे खाजगीकरण होत असून नोकरीचे कंत्राटीकरण सुरू आहे. त्यामुळे शिक्षणाचे खाजगीकरण रोखण्यासाठी आणि नोकरीच्या शाश्वतीसाठी संघटित होऊन लढावे लागले, असे आवाहन केले. अध्यक्षस्थानी जिल्हा अध्यक्ष संस्कृती गोडे होत्या तर प्रास्ताविक जिल्हा सचिव अक्षय घोडे यांनी केले. यावेळी एसएफआय चे महाराष्ट्र राज्य सचिव सोमनाथ निर्मळ, राज्य उपाध्यक्ष भास्कर म्हसे, माजी पुणे जिल्हा सचिव गणेश दराडे, माजी पुणे जिल्हा अध्यक्ष गणपत घोडे यांनी आपले मनोगत व्यक्त करत अधिवेशनास शुभेच्छा दिल्या. 'अभ्यास आणि संघर्ष' हे ब्रीदवाक्य समोर ठेवून आयोजित करण्यात आलेल्या या अधिवेशनात जिल्ह्यातील शैक्षणिक समस्या, विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधा आणि सद्यस्थितीतील शिक्षणाचे बाजारीकरण यावर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.